
सोमवार, ११ एप्रिल २०२२
◆ वर्ष १४ ◆ अंक २६३
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

अंतरंग

नदीतील गाळ काढण्याचा खर्च शासनाला सोसेना/२
खंडाळा घाटात अपघात; आठ जण जखमी/७
महाराष्ट्र केसरी पृथ्वीराजला भाजपकडून बक्षीस घोषित/८

## कोरोना संपलेला नाही; पंतप्रधान मोदींचा इशारा



**नवी दिल्ली :** देशात अलिकडेच कोरोनाची तिसरी लाट संपली. देशातील कोरोना रुग्णांची संख्या सध्या एक हजारांच्या आसपास आढळत असून सर्वच राज्यांमधील निर्बंध हटवले गेले आहेत. कोरोना नावाची महामारी संपलीये, अशी आशा वाटत असताना कोरोना हा संपलेला नाही, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. कोरोना व्हायरस संपलेला नाही आणि तो पुन्हा कधीही वाढू शकतो. त्यामुळे कोरोनापासून बचावासाठी खबरदारी घ्या. दुर्लक्ष करू नका, असा इशारा पंतप्रधान मोदींनी दिला आहे. बहुरूपिया कोरोना कधी कोणत्या रूपात परत येईल हे कोणालाच माहीत नाही. देशातील लोकांच्या पाठिंब्यामुळे या कोरोनाचा प्रसार नियंत्रित करण्यासाठी लसींचे जवळपास १८५ कोटी डोस देणे शक्य झाले आहे, असेही पंतप्रधान मोदी म्हणाले.

# शिवसेनेला हिंदुत्वाचा विसर

## विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांचा हल्लाबोल



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

हिंदूत्ववादी शिवसेना ही काँग्रेस, राष्ट्रवादीसोबत गेल्यानंतर धर्मनिरपेक्ष झाली आहे. जेव्हा शिवसेनेच्याच एका पदाधिकाऱ्याकडून हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा उल्लेख जनाब बाळासाहेब ठाकरे असा करण्यात आला, तेव्हाच शिवसेना हिंदुत्ववादापासून दूर गेल्याचे स्पष्ट झाले, असा हल्लाबोल माजी मुख्यमंत्री तथा विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी (दि. १०) येथे केला. कोल्हापूर उत्तर विधानसभा पोटनिवडणुकीत भाजप उमेदवार सत्यजित उर्फ नाना कदम यांच्या प्रचारार्थ आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील व अन्य प्रमुख नेते सोबत होते.

शिवसेनेच्या हिंदुत्वासंबंधीच्या दुटप्पी भूमिकेचा समाचार घेताना विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस म्हणाले की, हनुमान चालीसा ही आपल्या देशाची एक परंपरा आहे. हनुमान चालीसा म्हटल्याने काही लोकांना इतका राग का येतो? भोंगे वाजल्याने राग येत नसेल, तर हनुमान चालीसानेही राग यायला नको.

शिवसेनेला हिंदुत्वाचा विसर पडल्याच्या मुद्द्यावरून विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीसांनी निशाणा साधला. ज्या वेळी शिवसेनेनच्या विभाग प्रमुखाने उर्दूमध्ये कॅलेंडर काढून जनाब बाळासाहेब ठाकरे असे नाव छापले त्याच वेळी हिंदूत्ववादी असलेली शिवसेना ही धर्मनिरपेक्षवादी झाली. आमचा कुठल्याही धर्माला विरोध नाही. कोणत्याही धर्माच्या प्रार्थनेला विरोध नाही, पण लांगुलचालनाला आमचा विरोध आहे, असे फडणवीसांनी स्पष्ट केले.

कोल्हापूरमधील जनतेच्या मनात राज्य सरकारविरोधात मोठा आक्रोश आहे. कोल्हापूरकरांसाठी एकही चांगले काम या सरकारने केलेले नाही. महापुरात मागील सरकारने जशी मदत केली तशी आता पुन्हा केली जावी अशी नागरिकांची अपेक्षा होती, मात्र या सरकारने पूरग्रस्तांना काहीही मदत केली नाही. याचा परिणाम पोटनिवडणुकीच्या निकालात दिसून येईल. ही पोटनिवडणूक जिंकत राज्यातील भाजपचा १०७वा आमदार निवडून येईल, असा विश्वास विरोधी पक्षनेते फडणवीस यांनी व्यक्त केला.

दरम्यान, या वेळी बोलताना विरोधी पक्षनेते फडणवीस यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या मुंबईतील सिल्व्हर ओक निवासस्थानावर झालेल्या एसटी कर्मचारी आंदोलनाबाबतच्या आपल्या भूमिकेचा पुनरूच्चार केला. आम्ही आंदोलनात एसटी कर्मचाऱ्यांच्या सोबत होतो. सातत्याने त्यांची मागणी लावून धरली होती, पण सरकारने आडमुठी भूमिका घेतली. पाच महिने हा संप चिघळवत ठेवला. कर्मचाऱ्यांचा हा उद्रेक आजही आपल्याला पाहायला मिळतोय, पण शरद पवारांच्या घरी घडलेली घटना चुकीची होती. तिचा आम्ही निषेधच करतो, असे ते म्हणाले. तेथे लोकं जाणार असल्याचे पत्रकारांना माहिती होते. घटना घडताना सगळी प्रसारमाध्यमे उपस्थित राहिली, मात्र पोलीस कसे काय झोपले होते, असा सवालही फडणवीस यांनी केला.

## मुख्यमंत्रीपद टिकवण्यासाठी शिवसैनिकांना त्याग करावा लागतोय –चंद्रकांत पाटील



**कोल्हापूर :** मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंकडून सरकार टिकवण्याचा प्रयत्न केला जात आहे. सरकार टिकवण्याचा शिवसेना आटोकाट प्रयत्न करीत आहे, मात्र मुख्यमंत्रीपद टिकवण्यासाठी शिवसैनिकांना त्याग करावा लागला असल्याचे भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी म्हटले आहे.

कोल्हापूर उत्तर विधानसभा पोटनिवडणुकीसाठी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी कोल्हापुरचा दौरा करीत प्रचार केला. या वेळी त्यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंवर टीका केली. महाराष्ट्राचे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेच आहेत. ते बनण्याचा कोणी प्रयत्न केलेला नाही, असे त्यांनी म्हटले तसेच हिंदुहृदयसम्राटऐवजी जनाब तुम्हीच लावत आहात, असा टोमणाही त्यांनी मारला.

भाजप प्रदेशाध्यक्ष पाटील पुढे म्हणाले की, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी भगव्याला मत द्या सांगत एक प्रकारे भाजपलाच मतदान करण्याचे आवाहन केले आहे. कोल्हापूरची जागा हिंदूत्व न मानणाऱ्या काँग्रेसकडे जाऊ नये ही आमची अपेक्षा आहे.

## रा म न व मी उ त्सा हा त





**पनवेल :** मर्यादापुरुषोत्तम प्रभू श्रीरामचंद्रांची रामनवमी रविवारी शिवाजीनगर येथे उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी तेथील मंदिरात जाऊन दर्शन घेतले. या वेळी शिवाजीनगर अध्यक्ष कृष्णाशेठ ठाकूर, पं. स. सदस्य तथा भाजप महिला मोर्चा तालुका अध्यक्ष रत्नप्रभा घरत, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, ग्रामपंचायत सदस्य योगिता भगत, कामिनी कोळी, उषा देशमुख, शिवाजीनगर उपाध्यक्ष व्ही. के. ठाकूर, सुधीर ठाकूर, गजानन ठाकूर, धनंजय ठाकूर, पी. के. ठाकूर, आशिष घरत, पंढरीनाथ ठाकूर, शनिदास ठाकूर, श्रीधर ठाकूर, कुसुम ठाकूर, शोभा ठाकूर, वंदना ठाकूर, रेणुका ठाकूर, लता ठाकूर, नंदा ठाकूर, आदेश ठाकूर, आदित्य ठाकूर, अपूर्व ठाकूर आदी उपस्थित होते.



**पनवेल : आदर्श राजा श्रीराम प्रभूंच्या रामनवमीनिमित्त भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी चिंध्रण येथील मंदिरात जाऊन दर्शन घेतले. या वेळी भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, भाजप नेते एकनाथ देशेकर, नामदेव जमदाडे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.**

## निवडक

### सुरक्षा दलांनी घेतला बदला; दोन दहशतवादी चकमकीत ठार

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरमधील श्रीनगर येथे केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (सीआरपीएफ) जवानांवर नुकत्याच झालेल्या हल्ल्यात सामिल असलेले लष्कर-ए-तोयबा संघटनेचे दोन पाकिस्तानी दहशतवादी रविवारी (दि. १०) शहरात झालेल्या चकमकीत ठार झाले. यात तीन सुरक्षा कर्मचारी जखमी झाले आहेत.

### पंतप्रधान मोदी आणि बायडेन यांच्यात आज व्हर्च्युअल बैठक

**नवी दिल्ली :** युक्रेन आणि रशिया यांच्यातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर सोमवारी (दि. ११) पंतप्रधान नरेंद्र मोदी हे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांच्यासोबत व्हर्च्युअल बैठक घेणार आहेत. या बैठकीत दोन्ही नेते सध्या सुरू असलेल्या द्विपक्षीय सहकार्याचा आढावा घेतील, असे परराष्ट्र मंत्रालयाने रविवारी सांगितले. रशियाने युक्रेनवर केलेल्या आक्रमणाच्या पार्श्वभूमीवर ही बैठक महत्वाची मानली जात आहे.

## मनसेकडून शिवसेना भवनासमोर हनुमान चालीसाचे पठण

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने रविवारी (दि. १०) थेट मुंबईतील शिवसेना भवनासमोर हनुमान चालीसा पठण केले. हिंदुत्व विसरलेल्या शिवसेनेला जाग आणण्याचा प्रयत्न असल्याचे सांगत रामनवमीचे औचित्य साधून मनसेने भोंगा लावून हनुमान चालीसाचे पठण केले. या प्रकरणी पोलिसांनी मनसैनिकांवर कारवाई केली आहे. यावर मनसे प्रवक्ते संदीप देशपांडे यांनी राज्य सरकारवर टीका केली आहे.

मनसेने शिवसेना भवनसमोर हनुमान चालीसा पठण केल्याने पोलिसांनी यशवंत किल्लेदार आणि इतर मनसैनिकांना ताब्यात घेतले. सोबतच भोंगा जप्त केला.

### पोलिसांनी केली कारवाई; संदीप देशपांडे यांची टीका



यानंतर मनसे प्रवक्ते संदीप देशपांडे यांनी राज्य सरकारवर टीका केली. शिवसेना भवन ही काही मशीद नाही, ज्याच्यासमोर हनुमान चालीसा लावली म्हणून कारवाई केली. शिवसेना भवन हे हिंदूंचे पवित्र स्थळ आहे. मग कारवाई का, असा सवाल देशपांडे यांनी केला आहे. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे सुपुत्र मुख्यमंत्री असताना अशा पद्धतीने कारवाई होतेय हे दुर्दैव आहे. ज्या टॅक्सीवर स्पीकर लावण्यात आले होते ती टॅक्सी विभागात फिरवण्यात येणार होती. रामनवमीनिमित्त हनुमान चालीसा लावणे गुन्हा आहे का, असा सवालदेखील देशपांडे यांनी केला आहे.

## वॉर्नर बरसला




**मुंबई : आयपीएलमध्ये रविवारी कोलकाता नाईट रायडर्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात सामना रंगला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना दिल्लीने तुफान फटकेबाजी करीत कोलकाताच्या गोलंदाजांना घाम फोडला. विशेष म्हणजे डेव्हिड वॉर्नरने ४५ चेंडूंमध्ये सहा चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने ६१ धावा केल्या. वॉर्नरचे या हंगामातील हे पहिले अर्धशतक आहे. यासोबतच तो आयपीएलमध्ये सर्वाधिक ५५ अर्धशतके करणारा पहिला खेळाडू ठरला आहे. दिल्लीने २० षटकांत २१५ धावांचा डोंगर उभा केला होता. प्रत्युत्तरात कोलकाताचा डाव १७१ धावांत संपुष्टात आला.**

## केंद्र सरकार जारी करणार ई-पासपोर्ट

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

तंत्रज्ञानामुळे दिवसेंदिवस अनेक गोष्टींमध्ये बदल होत चालला आहे. सर्वच गोष्टी आता स्मार्ट झाल्या आहेत. यामुळे वेळेचीदेखील बचत होते. याच दिशेने लोकांना अधिक सुलभता मिळावी यासाठी आता नियमित पासपोर्टच्या जागी ई-पासपोर्ट सरकारद्वारे जारी केला जाणार आहे. केंद्रीय परराष्ट्र राज्यमंत्री वी. मुरलीधरन यांनी ही माहिती दिली.

केंद्रीय मंत्री मुरलीधरन म्हणाले की, २०२२-२३च्या सुरुवातीला नागरिकांना ई-पासपोर्ट जारी करण्याची योजना आहे. नॅशनल इंफॉर्मेटिक्स सेंटरला ई-पासपोर्ट जारी करण्यासाठी तांत्रिक जबाबदारी सोपवली आहे. इंडिया सिक्युरिटी प्रेस (नाशिक) ई-पासपोर्ट तयार करेल.



# नदीतील गाळ काढण्याचा खर्चभार शासनाला सोसेना

## ▪ मागेल त्याला गाळ देण्याचा निर्णय ▪ कोकण महसूल विभागाच्या सचिवांनी दिला आदेश

**महाड : प्रतिनिधी**

महाप्रलयकारी पुरामुळे २१ ते २३ जुलै २०२१ मध्ये कोकणातील रायगड-रत्नागिरी जिल्ह्याला पुराचा मोठा तडाखा बसला होता. पुन्हा पावसाळ्यात पूरस्थिती उद्‌भवू नये यासाठी खाडी व नदीपात्रातील गाळ काढण्याचे काम जलसंपदा विभागाने हाती घेतले होते. मात्र नदीपात्रातील गाळ काढणे हे खर्चिक असल्याचे शासनाला आता लक्षात आल्याने खाडी व नदीपात्रातून व्यावसायिकदृष्ट्या वापर सोडून इतर वापराकरीता गौण खनिजमधून सूट देण्याचा निर्णय राज्य शासनाच्या महसूल व वनविभागाने घेतला आहे.

मागील वर्षी महाप्रलयंकारी पुरामुळे कोकणातील विशेषता रायगड जिल्ह्यातील महाड, पोलादपूर व रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण या शहरांना गावांना फटका बसला होता. या महापुरातून सावरण्याकरीता पूरग्रस्तांना राज्याच्या कानाकोपऱ्यातून मोठ्या प्रमाणावर मदत नागरिकांना मिळाली होती मात्र शासनाकडून केवळ अत्यल्प मदत देण्यात आली. त्यानंतर भविष्यात पुन्हा महापूर येऊ नये यासाठी महाड, चिपळूण येथे पूर नियंत्रण समित्या स्थापन झाल्या होत्या.

पूर नियंत्रण समितीच्या रेट्यामुळे शासनाने नदीत आणि खाडी पात्रातील गाळ काढण्याचे काम मागील तीन महिन्यांपासून सुरू केले. त्यासाठी राज्यातील शासनाच्या जलसंपदा विभागाच्या मालकीची डंपर, टिप्पर, पोकलेन, जेसीबी इत्यादी यंत्रणा आणून महाड, चिपळूण या ठिकाणी गाळ काढण्याच्या कामाला प्रारंभ केला, मात्र गाळ काढण्याचे काम संथ गतीने असल्याने पुन्हा पूरस्थिती निर्माण होईल, अशी ओरड पूर नियंत्रण समितीकडून झाल्याने खासगी यंत्रणा राबवून तापमानाने गाळ काढण्याच्या कामाला गती दिली.



असे असले तरी खासगी यंत्रणेमार्फत झालेला खर्च हा डोळे अधिक असून हा खर्च भागवताना शासनाला नाकीनऊ आले आहे. या यंत्रणांनी नदीपात्रातील गाळ काढला त्यांना अद्याप कोणताही मोबदला देण्यात आलेला नाही. केवळ वाहनांना डिझेल देऊन गाळ काढण्याचे काम चालू होते, त्यामुळे खाजगी यंत्रणादेखील हतबल झाली आहे.

महाड, चिपळूण येथील गाळ काढण्याच्या कामाबाबत वाढीव खर्च होत असल्याने व गाळ काढून देखील पुन्हा पूर परिस्थिती निर्माण झाली तर काय करावे? हा मोठा प्रश्न शासनासमोर उभा राहिला आहे. तसेच गाळ काढण्यात आलेल्या यंत्रणांना देण्यात येणारी रक्कम अव्वाच्या सव्वा असल्याने ज्या कोणत्याही व्यक्तीस व्यावसायिकदृष्ट्या वापर सोडून इतर वापराकरीता नदीपात्रातील गाळ हवा असल्यास तहसील कार्यालयामध्ये अर्ज करून स्वतःहून मशीनद्वारे काळ काढून घेऊन जावा, असे परिपत्रक राज्य शासनाचे महसूल व वनविभागाचे सहसचिव रमेश चव्हाण यांनी काढले आहे.

### पावसाळ्याआधी गाळ काढून होईल का?

*सध्या महाड तालुक्यात वाळण, शिवथर, बिरवाडीसह पाच ठिकाणी गाळ काढण्यात येत आहे. लाखो घनमीटर गाळ अद्यापही शिल्लक आहे. महाडजवळ दोन महिन्यांत केवळ अर्ध्या किमी अंतरावर गाळ काढण्यात आला आहे. त्यामुळे पासाळ्याच्याआधी हा गाळ काढून होईल का? असा प्रश्नदेखील काही जण उपस्थित करीत आहेत.*



## आरएसएसच्या वतीने उरण येथे बाईक रॅली



**उरण : प्रतिनिधी**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) वतीने उरण शहरात रविवार (दि. १०) श्री राम नवमीनिमित्त बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी जय श्रीरामाच्या घोषाने उरण शहर दुमदुमून गेले.

या बाईक रॅलीला मोरा येथील श्री राम येथे सर्वांनी दर्शन घेऊन सुरुवात झाली. पुढे भोवरा, हनुमान कोळीवाडा, बोरी, पेन्शनर पार्क, उरण, एनआय हायस्कूल, पालवी हॉस्पिटल नाका, गणपती चौक, राजपाल नाका, गणपती चौक, पेन्शनर पार्क येथे सांगता समारोप करण्यात आला.

या रॅलीत हस्तीमल मेहता, अजित भिंडे, पुरोषोत्तम सेवक, हितेश शाह, किसन पंचोली, नवीन कोटक, गोपाल प्रजापती, आकाश शाह, अभिषेख जैन, अवी जैन, नवीन जैन, दिनेश ठक्कर, जिगर ठक्कर, नयन जैन, प्रीतम जैन, मनन पटेल, गोपाल कुमावत, महेंद्र जैन, महावीर जैन, राहूल, दर्शन, अनिरुद्ध, सुरेश आदी सहभागी झाले होते.



**पनेवल : तालुक्यातील हरिग्राम ग्रामपंचायतीचे सदस्य अशोक माळी यांना वाढदिवसानिमित्त रविवारी भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, वाकडीचे माजी सरपंच नरेश पाटील उपस्थित होते.**





**पनवेल : मिरची गल्ली येथील श्रीराम मंदिरात रामनवमीनिमित्त नगरसेविका दर्शना भोईर यांनी दर्शन घेतले. आयोजक अनिल खुटले, राजू खुटले, विजय खुटले, भगवान पाटील यांच्यातर्फे मंदिरात येणाऱ्या भाविकांसाठी महाप्रसाद आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. या वेळी कोळीवाड्यातील महिलावर्गही उपस्थित होता.**

## ‘इतिहास नवी मुंबईचा’ एक उत्तम संशोधन –मधु मंगेश कर्णिक

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

अमृत पाटील नेरुळकर हे खऱ्या अर्थाने एक प्रतिभावंत साहित्यिक असून त्यांनी इतिहास नवी मुंबईचा या पुस्तकाच्या माध्यमातून इतिहासाचा धांडोळा घेतानाच भूगोलालाही चांगला न्याय दिला. येथील भूभाग, हवामान, पर्जन्यमान, वनउपज, जलसंपदा, जनजीवन यांची सविस्तर व अभ्यासपूर्ण माहिती दिलेली आहे. इतिहास नवी मुंबईचा हे पाटील यांचे केवळ ऐतिहासिक पुस्तक नसून पुढे आलेलं एक उत्तम संशोधन आहे, असे प्रतिपादन कोमसापचे संस्थापक, ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांनी नेरुळ येथे केले.



अमृत पाटील नेरुळकर लिखित इतिहास नवी मुंबईचा या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा शनिवारी (दि. १०) नेरूळ येथील वेलकम हॉल येथे झाला. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

व्यासपीठावर माजी खासदार संजीव नाईक, माजी महापौर जयवंत सुतार, माजी नगरसेवक गिरीश म्हात्रे, माजी नगरसेवक गणेश म्हात्रे, माजी नगरसेविका माधुरी सुतार, इतिहास संशोधक डॉ. अनंत देशमुख, ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे, रायगड भूषण प्रा. एल. बी. पाटील, ज्येष्ठ विधीज्ञ पी. सी. पाटील, साहित्यिक मोहन भोईर, साहित्यिका दमयंती भोईर, डॉ. अविनाश पाटील, सामाजिक कार्यकर्ते प्रल्हाद पाटील, दिपक भोपी, उपायुक्त संजय टेकाडे, ज्येष्ठ पत्रकार अंकुश वैती, विश्वरथ नायर, सुभाष हांडे देशमुख, माजी सरपंच मधुकर ठाकूर, प्रकाशिका अरुणा पाटील आदी उपस्थित होते.

रामप्रहर
वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा

## कोपर येथे शाळापूर्व तयारी मेळावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोपर गव्हाण येथे शैक्षणिक वर्ष २०२२-२३मध्ये इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शाळापूर्व तयारी अभियान मेळावा शनिवारी (दि. ९) आयोजित करण्यात आला होता.

या मेळाव्याचे उद्‌घाटन जिल्हा परिषद सदस्य रवींद्र पाटील यांच्या हस्ते झाले. मेळाव्यासाठी गव्हाण ग्रामपंचायतीच्या सरपंच माई भोईर, उपसरपंच विजय घरत, कोपर हायस्कूलच्या मुख्याध्यापिका साधना डोईफोडे, ग्रामपंचायत सदस्य रोशन म्हात्रे, सुनिता घरत, शाळा कमिटी सदस्य कांबळे, रघुनाथ देशमुख, माजी उपसरपंच रामदास ठाकूर, ज्येष्ठ कार्यकर्ते वसंतशेठ पाटील, सुधीर ठाकूर, कमलाकर देशमुख, केंद्र प्रमुख जोशी, ग्रामस्थ व पालक उपस्थित होते.

मेळाव्यामध्ये आकर्षक लेझीम पथक, गितमंच व नृत्याविष्काराने विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. या मेळाव्यात उपस्थित मान्यवरांचे स्वागत शाळेचे चेअरमन अनंताशेठ ठाकूर यांनी केले. सुत्रसंचालन नितीन ठाकूर यांनी केले.




## गुजरातमधील ‘एक्सई’बाधित रुग्ण मुंबईचा रहिवासी

**मुंबई : प्रतिनिधी**


गुजरातमध्ये आढळलेला एक्सईबाधित रुग्ण मूळचा मुंबईचा असून सध्या याची प्रकृती स्थिर असल्याचे मुंबई पालिका प्रशासनाने सांगितले.

सांताक्रूझ येथे राहणारा ६७ वर्षीय व्यक्ती त्याच्या पत्नीसह ११ मार्चला गुजरातमधील बडोद्याला गेला होता. तिथे ज्या हॉटेलमध्ये तो थांबला होता, तेथे त्याची ब्रिटनच्या दोन जणांसोबत बैठक होती. ब्रिटनचे हे नागरिक ६ मार्चला ब्रिटनहून आले होते. बैठकीनंतर ११ मार्चला या व्यक्तीला ताप आला.

१२ मार्चला तपासणी केली असता कोरोनाबाधित असल्याचे आढळले. त्यानंतर हा रुग्ण पत्नीसह खासगी टॅक्सी करून १३ मार्चला मुंबईच्या घरी परतला. मुंबईच्या घरी २० मार्चपर्यंत रुग्ण विलगीकरणात होता. ११ मार्चनंतर त्याला कोणतीही लक्षणे आढळलेली नाही. त्याच्या संपर्कात आलेली त्यांची पत्नी आणि मोलकरीण दोघीही बाधित नसल्याचे आढळले, असे मुंबई पालिका प्रशासनाने सांगितले आहे.


या रुग्णाची प्रकृती आता स्थिर असल्याचेही सांगण्यात आले आहे.

### दुखवटा



**पार्वतीबाई देशेकर**

**पनवेल** : चिंध्रण येथील पार्वतीबाई मनोहर देशेकर यांचे वयाच्या ८५व्या वर्षी मंगळवारी (दि. ५) निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. पार्वतीबाई या भाजप नेते एकनाथ देशेकर यांच्या चुलती होत. पार्वतीबाई यांच्या निधनाची माहिती मिळताच आमदार प्रशांत ठाकूर, भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष संजय पाटील यांनी देशेकर कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले.

पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**सोमवार, दि. ११ एप्रिल २०२२ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड**

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल ▪ ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ▪ ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर

**कोव्हॅक्सिन**

- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली (१५+ व १८+)
- ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१५+ )
- ९. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल (१५+)
- १०. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर (१५+)

**कार्बेव्हॅक्स**

- ११. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१२ ते १४)

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पुर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

# उलवे नोडमध्ये रामनवमी उत्साहात

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांची विविध कार्यक्रमांमध्ये प्रमुख उपस्थिती




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे नोड सेक्टर १७ येथे श्रीराम नवमीनिमित्त विविध कार्यक्रम व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व कार्यक्रमांना या कार्यक्रमांना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

श्रीराम नवमीनिमित्त भारती सामाजिक संस्थेच्या वतीनेभव्य बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीला रविवारी सकाळी १०.३० वाजता रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्‌र्स कॉम्प्लेक्स येथून सुरूवात झाली. बाईक रॅली पूर्ण उलवे नोडमध्ये फिरून शिवाजीनगर येथे मंदिरात पोहचली. त्यानंतर सकाळी ११.३० वाजता हनुमान मंदिराचे ध्वजपूजन करण्यात आले.

या कार्यक्रमांना लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, सदस्य योगिता भगत, उषा देशमुख, कामिनी कोळी, किशोर पाटील, वितेश म्हात्रे, सुधीर ठाकूर, अवधेश महतो, मोर्या सिंग, शेखर, काशिद, आशिष घरत, भाऊ भोईर, भाजप महिला मोर्चा उलवे नोड उपाध्यक्ष सुजाता पाटील आदींसह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

भारतीय सामाजिक संस्थेतर्फे आयोजित बाइक रॅलीमध्ये संस्थेचे अध्यक्ष अवधेश कुमार महतो, उपाध्यक्ष विकास सिंह, राजकुमार सिंह, सचिव मनोज कुमार मौर्या, उपसचिव गौतम कुमार, सुभाष पांडे, कोषाध्यक्ष अनिमेष कुमार, राजीव रंजन, अ‍ॅड. सुनील मौर्या, जवाहरलाल चौहान आणि संस्थेचे सदस्य जय प्रकाश सोनी, संदीप सावंत, मनोज जांगिड, राधे कृष्णा पाठक, आशीष शर्मा, विजय शंकर सिंह, गुलाब सिंह आदी उपस्थित होते.



# पनवेलमधील पुरातन श्री लक्ष्मीनारायण मंदिरात रामजन्मोत्सव सोहळा साजरा

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल येथील दोनशेपेक्षा जास्त वर्षे पुरातन असलेल्या श्री लक्ष्मीनारायण मंदिरात रविवारी (दि. १०) रामनवमीनिमित्त रामजन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. कोरोना निर्बंध उठल्यानंतर होणाऱ्या या कार्यक्रमाला ग्लोबल कायस्थ कॉन्फेरन्सचे सदस्यही उपस्थित होते

श्री लक्ष्मीनारायण मंदिर हे चांद्रसेनिय कायस्थ समाजाचे म्हणून ओळखले जाते. या पुरातन मंदिराचा १९३६ मध्ये जिर्णोध्दार झाल्याचे पुरावे मिळतात. सन १९५३ मध्ये सीकेपी समाजाने या ट्रस्टची नोंदणी करण्यात आली. उद्योगपती राजू गुप्ते यांनी मातोश्री श्रीमती कांता गुप्ते यांच्या इच्छेप्रमाणे मंदिराचा सन २०२० मध्ये जीर्णोद्धार केला. आज श्री लक्ष्मीनारायणाचे सुंदर मंदिर पनवेलच्या सौंदर्यात भर घालीत आहे. मंदिरात समाजाच्या ट्रस्ट तर्फे रविवार रामजन्मोत्सव साजरा करण्यात आला.

आठवडाभरापासून रोज संध्याकाळी मंदिरात भाविक रामरक्षा पठण करीत होते. रविवारी सकाळी ही समाजातील महिलांचे भजन झाले. त्यानंतर सजवलेल्या पाळण्यात श्री रामाची मूर्ति ठेवून वैशाली कुळकर्णी, वैशाली वैद्य, नीलिमा वैद्य, उज्वला गडकरी, प्रतिभा हजरनीस, सानिका पत्की व गौरी राजे यांनी पाळणा म्हटला त्यानंतर सुंठवडा वाटण्यात आला. शेवटी महाप्रसाद झाला

या कार्यक्रमाला ग्लोबल कायस्थ कॉन्फ्रेंसच्या रूचिता सिन्हा, विजय सिन्हा, नवीन कुमार, उद्योजक राजू गुप्ते, प्रदीप गुप्ते, राजा गुप्ते व डॉ. पुष्कर लिखिते उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ट्रस्टचे अध्यक्ष योगेश राजे, सचिव गिरीश गडकरी, सहसचिव संदीप देशमुख, खजिनदार श्रीकृष्ण चित्रे, महेश कर्णिक व मिलिंद देशपांडे यांनी मेहनत घेतली.

## प्रभू श्रीरामांचे दर्शन




**पनवेल : रामनवमी रविवारी ठिकठिकाणी भक्तिभावाने साजरी झाली. यानिमित्त भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी तोंडरे येथील मंदिरात जाऊन दर्शन घेतले. या वेळी भाजप जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, एकनाथ देशेकर, नगरसेवक हरेश केणी, माजी सरपंच राम पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते. या वेळी मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.**









**पनवेल : रामनवमीनिमित्त भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शिवकर, वाजे, चिंचवली, हरिग्राम, चिंध्रण, ढोंगऱ्याचा पाडा, कळंबोली येथील मंदिरात प्रभू श्रीरामांचे दर्शन घेतले. या वेळी भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष आनंद ढवळे यांच्यासह रवींद्र म्हात्रे, निवास म्हात्रे, अशोक माळी, विश्वास म्हात्रे, धनाजी म्हात्रे, राहुल म्हात्रे, विशाल म्हात्रे, श्रीकर म्हात्रे, अभिजित म्हात्रे, करण भोपी, राम म्हात्रे, रोशन म्हात्रे, जगदिश म्हात्रे, राजेश म्हात्रे, अक्षय म्हात्रे, संदेश म्हात्रे, सोपान भोपी, मारूती पाटील, आंबो ढवळे, मिलिंद पोपेटा, जगदिश ढवळे, गोपाळ पाटील, चंद्रकांत ढवळे, माया पाटील, गोपीनाथ ढवळे तसेच पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते.**



**पनवेल : भाजप ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष आणि महापालिकेचे नगरसेवक अ‍ॅड. मनोज भुजबळ यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रविवारी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे प्रशांत फुलपगार, यतीन पाटील, राकेश भुजबळ, नितीन भुजबळ, अजित लोंढे, किशोर शिंदे, क्रांती कुमार आदी उपस्थित होते.**



**पनवेल : नगरसेवक अजय बहिरा यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रविवारी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप युवा नेते प्रतिक बहिरा, प्रमोद बहिरा, जितू खुटकर, महेश राहुळ, प्रशांत बहिरा, श्रेयस बहिरा आदी उपस्थित होते.**



**पनवेल : येथील कच्छ युवक संघ व नगरसेवक अजय बहिरा यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर व मोफत ई-श्रम महानोंदणी अभियान रविवारी आयोजित करण्यात आले होते. या वेळी भाजप युवा नेते प्रतिक बहिरा, पंकज डावलेकर, अमित सिंग, स्वप्नील देशमुख, बसवराज रेडी, अजिंक्य चव्हाण आदी उपस्थित होते.**

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : १६

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअ‍ॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).

**१. पुढीलपैकी कोणता कर प्रत्यक्ष कर आहे?**
- ***अ.*** जीएसटी
- ***आ.*** कंपनी कर
- ***इ.*** सीमा शुल्क
- ***ई.*** रस्त्यावरील टोल

**२. मार्च २०२२ ला संपलेल्या आर्थिक वर्षांत देशात इतका विक्रमी कर वसूल झाला आहे.**
- ***अ.*** २७ लाख कोटी रुपये
- ***आ.*** १४ कोटी लाख रुपये
- ***इ.*** १२ लाख कोटी रुपये
- ***ई.*** ३० लाख कोटी रुपये

**३. भारतात ७ जुलै २०२१ रोजी सर्वाधिक वीज वापर झाला, तो किती होता?**
- ***अ.*** २०० गिगावॅट
- ***आ.*** २००.५७ गिगावॅट
- ***इ.*** १९९.२९ गिगावॅट
- ***ई.*** २०५ गिगावॅट

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

# उरणमध्ये रामनवमी जन्मोत्सव; गावागावांत धार्मिक कार्यक्रम

**उरण : वार्ताहर**

उरण शहरासह तालुक्यातील चिरनेर, चिर्ले, फुंडे, दिघोडे येथील श्रीराम मंदिरात मोठ्या भक्तिभावाने, धार्मिक पुजा अर्चा करून श्री रामनवमी जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला. या वेळी अनेक भाविकांनी, ग्रामस्थांनी आपआपल्या कुटुंबासह श्रीरामाचे दर्शन घेण्यासाठी मंदिरात गर्दी केली होती.

उरण शहरातील मोरा कोळीवाडा, देऊळवाडी येतील विठ्ठल मंदिर येथे श्रीराम नवमी जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा झाला. श्री रामनवमी जन्मोत्सवानिमित्त चिरनेर येथील मंदिरात राजाशेठ खारपाटील यांच्या कुटुंबीयांकडून श्रीरामाच्या मूर्तींना भक्तिभावाने अभिषेक घालण्यात आले. या वेळी काकड आरती, भजन किर्तन, जन्म सोहळा, महाप्रसाद आणि सायंकाळी पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी अनेक भाविकांनी ग्रामस्थांनी प्रभु श्रीरामाचे दर्शन घेऊन, महाप्रसादाचा लाभ घेतला.



## संपादकीय

# शिवसेनेचे बेगडी हिंदुत्व

एकेकाळी कडव्या हिंदुत्वासाठी ओळखल्या जाणाऱ्या शिवसेनेने महाराष्ट्राची सत्ता आणि मुख्यमंत्रीपद मिळविण्यासाठी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसची साथ धरली. सोबतच आपल्या मूळ भूमिकेला सोयीस्कर बगल दिली. राजकारणात वेगवेगळ्या युत्या-आघाड्या होत असतात, मात्र त्यासाठी थेट विचारधारेला तिलांजली देणे कुणालाही न पटण्यासारखे आहे.

**एकेकाळी जाज्वल्य हिंदुत्वाचा पुरस्कार करणारी राज्यातील महत्त्वाची पक्ष संघटना म्हणून शिवसेना मानली जायची. हिंदूहृदयसम्राट ही पदवी मानाने मिरविणारे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब यांनी तर 'गर्व से कहो हम हिंदू है', असे म्हणत आपल्या भूमिकेचा खुलेपणाने प्रचार व प्रसार केला. बाळासाहेब हयात असेपर्यंत शिवसेनेकडून ध्येय-धोरणे आणि विचार यांच्याशी कधीही तडजोड वा प्रतारणा झाली नाही. उलट जेव्हा जेव्हा हिंदू धर्मावर कुणी आघात करण्याचा प्रयत्न केला तेव्हा बाळासाहेबांनी हिंदुत्वाचा हुंकार वृद्धिंगत केल्याचा इतिहास आहे. अर्थातच, इतर धर्मांना कमी लेखणे, धर्मा-धर्मामध्ये दुही निर्माण करणे, दंगे घडवून आणणे याचे समर्थन करता येणार नाही, परंतु आपापल्या धर्मासाठी कार्य करण्याचे स्वातंत्र्याला प्रत्येकाला आहे. भारतीय हिंदू धर्माला फार मोठा इतिहास व परंपरा आहे. प्राचीन धर्मांपैकी एक असलेल्या हिंदू धर्माला आध्यात्मिक अधिष्ठान लाभलेले आहे. स्वामी विवेकानंद यांनी अमेरिकेतील शिकागो येथील जागतिक धर्म परिषदेत हिंदू धर्माचे महत्त्व अनेक उदाहरणे देत अभ्यासपूर्ण रितीने अधोरेखित केले होते. त्यानंतरही अनेक महनीय व्यक्तींनी, संस्थांनी हिंदू धर्माची पताका फडकवित ठेवली. यामध्ये भारतीय जनता पक्ष नेहमीच अग्रेसर राहिलेला आहे. भाजपच्या सोबतीने शिवसेनेनेही हिंदुत्वासाठी योगदान दिले, पण स्वार्थ आणि सत्तेच्या मोहापायी बाळासाहेबांचे पुत्र उद्धव ठाकरे यांनी मात्र विचारधारेला तिलांजली देऊन हिंदुत्वाला मुंबईच्या वेशीवर टांगले आहे. ज्या काँग्रेस-राष्ट्रवादीला आयुष्यभर शिवसेना नेत्यांनी शिव्यांची लाखोली वाहिली त्याच पक्षांच्या मांडीला मांडी लावून सध्या शिवसेनेकडून लांगूलचालन सुरू आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने मशिदीच्या भोंग्यांना उत्तर म्हणून ठिकठिकाणी हनुमान चालीसा सुरू केला आहे. मनसेने रामनवमीच्या निमित्ताने शिवसेना भवनासमोर भोंग्यावर हनुमान चालीसा वाजवला. यामुळे मनसे नेते यशवंत किल्लेदार आणि काही कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. याचा मनसेने निषेध करीत शिवसेनेचा समाचारही घेतला आहे. या संदर्भात बोलताना विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेनेचे हिंदूत्व कसे बेगडी आहे हे स्पष्ट केले. हनुमान चालीसा ही आपल्या देशाची एक परंपरा आहे. हनुमान चालीसा म्हटल्याने काही लोकांना इतका राग का येतो, असा सवाल त्यांनी शिवसेनेला केला. भोंगे वाजल्याने राग येत नसेल, तर हनुमान चालीसानेही राग यायला नको, असेही फडणवीस म्हणाले. कोणत्याही धर्माच्या प्रार्थनेला आमचा विरोध नाही, पण लांगुलचालनाला आमचा विरोध आहे हे सांगायलाही फडणवीस विसरले नाहीत. या वेळी त्यांनी शिवसेनेच्या बदलत्या भूमिकेचा आपल्या खास शैलीत समाचार घेतला, पण यातून शिवसेना सुधारेल का हा खरा प्रश्न आहे. सत्तेसाठी शिवसेनेची भूमिका सातत्याने बदलत आहे. यातून हळूहळू त्यांची मूळ ओळखच नाहीशी होत आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे अधूनमधून बाजू सावरण्याचा प्रयत्न करतात, पण जिथे विचारातच खोट निर्माण झाली आहे तिथे कितीही सारवासारव केली तरी लोक विश्वास ठेवणार नाही आणि एक दिवस या दुटप्पी मंडळींना त्यांची जागा निश्चितपणे दाखवून देतील.**

## खबरबात

संतोष पेरणे

# शर्यतींचा धुरळा उडणार, पण...





बैलगाडी शर्यतसाठी शासनाने परवानगी दिली आहे, मात्र रायगड जिल्ह्यात शासनाची परवानगी न घेता आयोजित केलेल्या बैलगाडा शर्यतीमध्ये दोन अपघात झाले आणि रायगड जिल्ह्यातील बैलगाडा शर्यतींवर बंधने येऊ लागली. प्रशासनाचे लक्ष जिल्ह्यातील बैलगाडा शर्यतींकडे लागून असल्याने चोरून होणाऱ्या बैलगाडा शर्यतीदेखील आयोजित करण्याची हिंमत बैलगाडा प्रेमी करीत नव्हते, पण शासनाने सुप्रीम कोर्टाच्या आदेशाने बैलगाडी शर्यतीसाठी अधिकृत परवानगी घेऊन अशा शर्यती आयोजित केल्यास प्रशासन परवानगी देऊ शकते. हा मेसेज आता रायगड जिल्ह्यात सर्वत्र फिरू लागल्याने गुढी पाडव्याला ठाणे जिल्ह्यात शासनाच्या सर्व परवानग्या घेऊन बैलगाडा शर्यत आयोजित करण्याच्या हालचाली सुरू झाल्या. त्यातून कर्जत तालुक्यात बैलगाडा शर्यती पहिल्यांदा शासनाची परवानगी घेऊन आयोजित झाल्या आणि दिवसभर शासनाचे अधिकारी आणि पोलीस यांच्या देखरेखीखाली शर्यती आयोजित झाल्याने आता जिल्ह्यात बैलगाडा शर्यतींचा धुरळा उडणार असून बैलगाडी शर्यतीत राज्यात सर्वाधिक उत्साह दाखवणारा जिल्हा असलेल्या रायगड जिल्ह्यात आगामी दोन महिने रणरणत्या उन्हात बैलगाडा शर्यतींचा धुरळा उडणार हे जवळपास नक्की आहे.

बैलगाडा शर्यतीसाठी मैदान, प्रेक्षकांची सुरक्षा, जनावरांची-पशूंची सुरक्षा आणि नियमनाचे काटेकोरपणे पालन करण्यासाठी महसूल, पोलीस आणि पशुवैद्यकीय अधिकारी यांची उपस्थिती हे सर्व बैलगाडा शर्यतीसाठी महत्त्वाचे असेल. बैलगाडा शर्यतींच्या दृष्टीने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उपविभागीय दंडाधिकारी आणि पोलीस अधीक्षक, रायगड अलिबाग यांनी उपोद्घातातील बैलगाडी शर्यत आयोजित करण्याबाबत शासन कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभागाकडील अधिसूचना / परिपत्रक / नियमांतील अटी व शर्तींच्या अधिन राहून परवानगी देणेबाबत हरकत नसल्याचे कळविले जाईल. शासन आदेशामध्ये नमूद केलेल्या मागदर्शक सूचनानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग पनवेल, उपविभागीय दंडाधिकारी आणि पोलीस अधीक्षक, रायगड अलिबाग यांनी सादर केलेल्या अहवालानुसार बैलगाडी शर्यत आयोजित करणेबाबत खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून परवानगी देण्यात येऊ शकते. बैलगाडा शर्यतीसाठी घालण्यात आलेल्या अटी मध्ये गाडीवान म्हणून बैलगाडी शर्यतीत सहभाग घेऊ इच्छिणारा कोणताही गाडीवान किंवा सहभागी यांच्या ओळखीबाबतचा पुरावा आणि बैल व वळू यांचे छायाचित्र यांसह शर्यतीचे ४८ तास आधी आयोजकांकडे शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाकडील १०/११/२०१७ रोजीच्या अधिसूचनेतील अनुसुची-क मध्ये विहीत केलेल्या नमुन्यामध्ये अर्ज करेल. आयोजित बैलगाडा शर्यतीस प्रारंभ होण्यापूर्वी, शर्यतीस उपस्थित राहणाऱ्या दोन अधिकाऱ्यांकडे आयोजकांनी अर्जाचे नमुने आणि नोंदणीकृत पशुवैद्यकीय व्यावसायिका कडील स्वास्थ प्रमाणपत्र सादर करावे लागणार आहे. तर ज्या गाडीवानाकरिता व बैलाकरिता अर्जाचे नमुने आणि पशुवैद्यकीय स्वास्थ प्रमाणपत्रे आयोजकांनी प्राप्त केली आहेत आणि ती त्यांनी सदर अधिकाऱ्यांकडे सादर केली आहेत. केवळ तोच गाडीवान शर्यतीत भाग घेण्यास हक्कदार असेल. शर्यतीसाठी १००० मीटरपेक्षा अधिक लांबीचे धावण्याचे अंतर नसेल अशा योग्य धावपट्टीवर बैलगाडी शर्यतीचे आयोजन करावे, बैलगाडी शर्यतीची धावपट्टी ही अतिशय उतार असलेली, दगड किंवा खडक असलेली, चिखल, दलदल असलेली, पाणथळीची किंवा पातळ चिखल असलेले ठिकाण असलेली नसावी. बैलगाडी शर्यत रस्त्यावर किंवा महामार्गावर आयोजित करण्यात येऊ नये, अशी नियमावली देण्यात आली आहे. बैलांना किंवा वळूना एखाद्या विशिष्ट शर्यतीसाठी किमान ३० मिनिटे आराम द्यावा आणि कोणत्याही वळूचा किंवा बैलाचा वापर एका दिवसामध्ये तीनपेक्षा अधिक शर्यतीसाठी करण्यात येऊ नये असे आदेश आहेत, तर वळू किंवा बैलांना धावपट्टीवर आणण्यापूर्वी किमान २० मिनिटे आराम देण्याचे आदेश असतात.

या शर्यतीमध्ये केवळ एका गाडीवानास बैलगाडी चालविण्यास परवानगी असेल आणि अन्य कोणतेही वाहन धावपट्टीवर किंवा धावपट्टी बाहेर बैलगाडी भोवती चालविता येणार नाही या नियमांकडे आयोजक आणि अधिकारी वर्गाचे लक्ष असणार आहे. कोणताही गाडीवान किंवा बैलाच्या शर्यतीचा प्रस्ताव देणारी व्यक्ती, तिच्याकडे किंवा गाडीवर कोणतीही काठी, चाबूक, पिंजरी किंवा बैलास दुखापत करू शकेल किंवा बैलास विजेचा धक्का देऊ शकेल असे कोणतेही साधन किंवा उपकरण बाळगणार नाही यांची खात्री आयोजकांना करावी लागणार आहे. या स्पर्धेच्या निमित्ताने पाय बांधणे किंवा बैलास काठीने मारणे अथवा पायाने मारणे अथवा चाबूक अथवा पिंजरी यासारखे कोणतेही साधन अथवा विद्युत धक्का किंवा अन्य साधनांचा वापरणे अथवा जनन अंग पिळणे अथवा जनन अंगावर लाथ मारणे अथवा जनावरे यांच्या अंगास इजा पोहचवणे अथवा शेपूट पिरघळणे अथवा शेपटीस चावा घेणे यास गाडीवानास प्रतिबंध असेल तसेच शर्यतीमध्ये धावणाऱ्या बैलांच्या अथवा वळूच्या जोड्या या एकमेकांशी योग्यरीत्या सुसंगत असाव्यात आणि बैलगाडी शर्यतीकरिता वळू अथवा बैलांना इतर कोणत्याही प्रकारच्या प्राण्यासोबत जुंपण्यात येणार नाही हे ध्यानात घेऊन वळू अथवा बैलांसाठी असलेल्या आरामाच्या जागेत पुरेसी सावली तसेच निवारा, पुरेसे खाद्य, चारा आणि पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे प्रतिबंधक असणार आहे.

आयोजकांनी शर्यती दरम्यान नोंदणीकृत पशुवैद्यकीय व्यावसायिकाची सेवा किंवा पशु रुग्णवाहिकेची सुविधा उपलब्ध करून ठेवणे आवश्यक राहणार आहे. त्यासाठी आयोजकांनी बैलगाडी शर्यत आयोजित करण्याकरिता वापरण्यात येणाऱ्या प्राण्याला कोणत्याही व्यक्तीकडून किंवा त्याचा प्रभार असणाऱ्या व्यक्तीकडून बैलगाडी शर्यती पूर्वी किंवा दरम्यान कोणत्याही साधनांद्वारे कोणतीही वेदना किंवा यातना दिली जाणार नाही याची खात्री करावी हे पाहण्याचे काम प्रशासन करणार आहे. त्यावेळी आयोजक, बैलांना किंवा वळू यांना शर्यती अगोदर किंवा त्यादरम्यान कोणतीही उत्तेजक औषधिद्रव्ये दिली जात नाही किंवा गेली नाहीत याची खात्री करून घ्यावे हे बंधनकारक असणार आहे याची खात्री करून ठिकाणी उपस्थित असणाऱ्या कोणत्याही गाडीवानाला अल्कोहल किंवा मादकद्रव्ये वापरण्यास किंवा बाळगण्यास मनाई असेल.

शर्यतीच्या वेळी कधीही ज्या वळू अथवा बैलांमध्ये थकवा, निर्जलीकरण, अस्वस्थपणा, घोणा फुटणे, दुखापत इत्यादी लक्षणे उक्त अधिकाऱ्यांना स्वतःहून किंवा प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे आढळून आल्यास, अशा वळू अथवा बैलांना बैलगाडी शर्यतीमध्ये भाग घेण्यास परवानगी देण्यात येणार नाही. आयोजक, बैलगाडी शर्यतीच्या वेळी वैद्यकीय सेवा किंवा रुग्णवाहिका सुविधा उपलब्ध करणेबाबतची व्यवस्था करावी लागेल तसेच आयोजक, बैलगाडी शर्यतीच्या वेळी प्रेक्षकांच्या सुरक्षततेसाठी सर्व सावधगिरीच्या उपाययोजना करणे बंधनकारक असेल. त्यावेळी आयोजकांनी धावपट्टीच्या दोन्ही बाजूस प्रतिबंधात्मक कठडे उभारील अथवा इतर सुरक्षेचे उपाय करतील. बैलगाडीच्या शर्यती दरम्यान गाडीवानास, बैलगाडीच्या चाकात वा इतरत्र अडकून अपघात होऊ शकेल, अशा स्वरुपाचे कोणतेही सैल अथवा तत्सम स्वरुपाचे कपडे परिधान करण्यास परवानगी देण्यात येऊ नये, असे आदेश या नियमावलीमध्ये परवानगी देतांना दिले जातात.

## बदलते तंत्रज्ञान

### व्हॉट्सॲपमध्ये येणार ट्विटरसारखे 'हे' फीचर


व्हॉट्सॲप वापरणाऱ्यांची संख्या प्रचंड आहे. जवळ-जवळ प्रत्येकच वयोगटातील युजर्स हे ॲप वापरतात. व्हॉट्सॲप आता फक्त इन्स्टंट मेसेजिंग ॲप राहिलेले नसून यात असे अनेक फीचर्स आहेत जे इतर सोशल मिडीया प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहेत. पण, अनेक वेळा व्हॉट्सॲप युजर्स तक्रार करतात की, त्यात टेलेग्राम किंवा ट्विटरसारखे फीचर्स दिलेले नाहीत. युजर्सच्या या तक्रारीचचे निवारण व्हॉट्सॲप लवकरच करेल असे दिसत असून कंपनी आता यात बदल करत आहे. व्हॉट्सॲपवर इतर युजर्सशी चॅट करणे हे बेसिक फंक्शन आहे. पण, आता लवकरच व्हॉट्सॲपमध्ये नवीन अपडेट येऊ शकते. यामुळे तुमची चॅट करण्याची पद्धत बदलेल.

व्हॉट्सॲपचे हे फिचर सध्या डेव्हलपमेंट फेजमध्ये आहे. व्हॉट्सॲपच्या नवीन फीचर्सवर नजर ठेवणाऱ्या WABetaInfo या साइटने कन्फर्म केले आहे की, व्हॉट्सॲपमध्ये पोलचा पर्याय लवकरच येऊ शकतो. मात्र, ते ग्रुप चॅटमध्ये उपलब्ध असेल. ट्विटर आणि टेलिग्राम सारख्या इतर सोशल मीडिया ॲप्सवर पोल फीचर आधीच उपलब्ध असून व्हॉट्सॲप कंपनी सध्या या फीचरवर काम करत आहे. कंपनी लवकरच व्हॉट्सॲपच्या बीटा व्हर्जनसाठी रिलीज करू शकते असेही सांगण्यात येत आहे. बीटा व्हर्जनमध्ये याची चाचणी घेतल्यानंतर लवकरच ते युजर्ससाठी रिलीज केले जाऊ शकते. याच्या मदतीने युजर्स ग्रुपमधील विशिष्ट विषयासाठी पोल तयार करू शकतात.

यामध्ये ग्रुपचे इतर युजर्स मतदान करू शकतात. या फीचरबाबत यापूर्वीच अहवाल आले आहेत. व्हॉट्सॲप युजर्सना या फीचरसह ग्रुपमध्ये पोल तयार आणि रद्द करण्याचा पर्याय देईल. WABetaInfoच्या रिपोर्टनुसार, व्हॉट्सॲप पोलमध्ये १२ संभाव्य पर्याय जोडण्याचा पर्याय दिला जाऊ शकतो. तसेच, यूजर्सना अधिक चांगला अनुभव मिळावा यासाठी कंपनीने काही जबरदस्त नवीन फीचर्स आणले आहेत. या नवीन फीचर्समुळे यूजर्संना व्हाइस नोट्स पाठवणे आणि रिसिव्ह करण्याचा एक्सपीरियन्स आधीच्या तुलनेत आणखी चांगला मिळणार आहे. व्हाइस मेसेजसाठी कंपनीने एकूण सहा नवीन फीचर्स आणले आहेत. यात आउट ऑफ चॅट प्लेबॅक, पॉज-रिझ्यूम रेकॉर्डिंग, वेवफॉर्म व्हिज्युअलायझेशन, ड्राफ्ट प्रीव्ह्यू, रिमेंबर प्लेबॅक आणि फास्टचा समावेश आहे.

# मानवतावादाचे पुरस्कर्ते महात्मा ज्योतिबा फुले

**विद्येविना मती गेली ।**
**मतीविना नीती गेली ।**
**नीतीविना गती गेली ।**
**गतीविना वित्त गेले ।**
**वित्ताविना शूद्र खचले।**
**इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।**



असा मोलाचा संदेश देणारे क्रांतीसूर्य, स्त्रिशिक्षाचे पुरस्कर्ते, महात्मा ज्योतिबा फुले यांचं जन्म ११ एप्रिल १८२७मध्ये पुणे येथील माळी समाजात झाला. महात्मा फुले यांची महती सांगताना आचार्य अत्रे म्हणतात, की ज्योतिबा हे केवळ बोलके सुधारक नव्हते तर ते कर्ते सुधारक होते. समाजातील शूद्र अतिशूद्र, शेतकरी आणि स्त्रिया यांना गुलामगिरीतून मुक्त करण्याच्या हेतूने प्रेरित होऊन ज्योतीरावांनी पत्नीला सावित्रीबाईंना सुशिक्षित केले आणि त्यांच्याकडे विद्यार्थीनीच्या अध्यापनाचे काम दिले. शिक्षण घेतले की, ज्ञान मिळते शिकल्यामुळे माणूस विचार करू लागतो. आणि स्वतःची परिस्थिती बदलवू शकतो. असा महात्मा फुले यांचा ठाम विश्वास होता. शिक्षणामुळे माणसाचे पशुत्व नाहीसे होऊन त्याला मनुष्यत्व प्राप्त होते, असे सावित्रीबाईंचे मत होते.

शिक्षणाशिवाय शहाणपण हरवले,
शहानपणाशिवाय नैतिकता गमावली,
नैतिकतेशिवाय विकास हरवला,
विकासाशिवाय संपत्ती हरवली,
संपत्ती नसतांना शुद्राचा नाश झाला.

शिक्षणाच्या अभावामुळे बरेच काही घडले. असे ज्योतिबा म्हणतात.


त्या काळात लोक म्हणत की, जो शिकेल त्यांच्या सातपिढ्या नरकात जातील. त्यावर उपाय म्हणुन त्यांना सांगण्यात आले की, गोऱ्या साहेबांनी एक शोध लावलाय की जो शिकणार नाही त्यांच्या चौदा पिढ्या नरकात जातील. या नरकाच्या भीतीने लोक शिकायला लागले. ज्योतिबाने विद्येचे महत्त्व सांगताना समाजाला सांगितले की, आपण जर विद्या ग्रहण केली तर आपल्याला असलेल्या सर्व कष्ट निवारण करण्याचे मार्ग आपल्याला लाभतील. ज्योतिबा फुले हे फक्त नाव नसून ते आधुनिक काळातील शिक्षणाच्या पित्याचे नाव आहे. ज्यांना कधी विसरता येणार नाही. अस्पृश्यासाठी ज्योतीरावांनी बहुमोल सेवाकार्य केले. सार्वजनिक पाणवठ्यावर दलितांचे पाण्यासाठी होणारे हाल पाहून त्यांनी त्यांच्यासाठी आपल्या घरचा पाण्याचा हौद खुला केला. ज्योतिबा यांनी अनेक प्रासंगिक आणि मौलिक प्रकारचे लेखन करून बरीच विचार प्रवर्तक पुस्तके प्रसिद्ध केल्या. आज स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात आपली प्रगती करत आहेत. हे शक्य झाले महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले मुळेच. स्त्री शिक्षणचा त्यांनी नेहमी पुरस्कार केला.

जैसे बोलणे बोलावे, तैसे चालणे चालावे.
मग महंत लीला स्वभावाचे अंगी बाने.

या वचनाची सार्थकता सिद्य करणारा महात्मा म्हणजे महात्मा ज्योतिबा फुले. धाडशी निर्णय घेऊन स्त्रीशिक्षणाचे बंद कवाडे खुली करणाऱ्या या महामानवाचे आम्हीं कायम ऋणी आहोत.

आधुनिक भारताचे शिल्पकार
दीनदूबळ्याचा बनले आधार,
यांच्यामुळे शिकली दीनदूबळ्याची मुले,
तो ज्ञानाचा दाता महात्मा ज्योतिबा फुले.

**-प्रिती व्हि. खोब्रागडे**
**रा-गुरढा, लाखनी, जि. भंडारा**
**मो. नं. ७२१९५१५४४८**




म्हसळा-गोरेगाव मार्गावरील सूर्योदयाच्या सुमारास दिसणारे विलोभनीय दृश्य. (छाया : अमेय नाझरे)

## आरोग्य प्रहर

### उन्हाळ्यात काकडीचे सेवन करणे सर्वोत्तम

कडक उन्हाची झळ आता सर्वांनाच बसू लागली आहे. त्याचबरोबर आता बाजारात काकडीदेखील मुबलक प्रमाणात उपलब्ध व्हायला लागली आहे. यंदाच्या उन्हाळ्यात भरपूर काकड्या खा. कारण हे खाण्याचे एक नाही तर अनेक फायदे आहेत. त्यात जीवनसत्त्वे अ, क, के, पोटॅशियम, ल्युटीन, फायबर असे अनेक पोषक घटक आढळतात.

**हाडे मजबूत होतात :** बदलत्या जीवनशैलीत हाडे दुखण्याची तक्रार सामान्य झाली आहे. तुम्हालाही हाडे दुखण्याची तक्रार असेल तर उन्हाळ्यात भरपूर काकडी खा. काकडी खाल्ल्याने तुमची हाडे मजबूत होतील.

**त्वचा आणि केसांसाठी फायदेशीर :** याशिवाय त्वचा आणि केसांसाठीही काकडी अतिशय खास आणि उपयुक्त आहे. काकडी खाल्ल्याने केसांची वाढ चांगली होते आणि त्वचा चमकदार होते.

**बद्धकोष्ठतेमध्ये देखील उपयुक्त :** बद्धकोष्ठतेच्या समस्येपासून सुटका मिळवण्यासाठीही काकडी खूप फायदेशीर आहे. तुम्हालाही बद्धकोष्ठतेचा त्रास होत असेल तर यावेळी तुम्ही तुमच्या आहारात काकडीचा समावेश जरूर करा.

**रक्तदाब नियंत्रणात राहील :** ब्लड प्रेशर संतुलित ठेवण्यासोबतच कोलेस्ट्रॉल नियंत्रित करण्यातही काकडी महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळे काकडीचा आहारात समावेश करण्याचा प्रयत्न करा.

**वजन कमी करण्यासाठी गुणकारी :** काकडी खाल्ल्याने वजन कमी करता येते. कारण काकडीत खूप कमी कॅलरीज असतात. याशिवाय त्यात वजन वाढवणारे नाही. यामध्ये फायबर देखील भरपूर असते आहे. यामुळे ते खाल्ल्यानंतर पोट भरलेले राहते आणि काहीही खावेसे वाटत नाही. जर तुम्हाला वजन कमी करायचे असेल तर तुमच्या आहारात काकडीचा समावेश जरूर करा.

**किडनीची समस्या दूर होते :** काकडीत पाण्याचे प्रमाण भरपूर असते हे आपणा सर्वांना माहीत आहे. पोटॅशियमसह, ते शरीरातून यूरिक ॲसिड आणि मूत्रपिंडातील अशुद्धता काढून टाकते.

**कोलेस्ट्रॉल ठीक राहते :** काकडी खाल्ल्यानेही कोलेस्ट्रॉलची पातळी राखता येते. त्यात एक घटक असतो, ज्याला आपण स्टेरॉल म्हणतो. शरीरातील कोलेस्ट्रॉलची पातळी योग्य राखते.काकडीत पाण्याचे प्रमाण खूप जास्त असते. काकडी खाल्ल्याने शरीरातील यूरिक ॲसिड आणि मूत्रपिंडातील अशुद्धी दूर होते.

**(येथे दिलेली माहिती घरगुती उपचार आणि सामान्य माहितीवर आधारित आहे. कृपया अधिक माहितीसाठी तज्ज्ञांशी संपर्क करा.)**

# कर्जत कोल्हारेतील नवीन वसाहतीला अशुद्ध पाणीपुरवठा

## जलशुद्धीकरण केंद्र नसल्याने नदीतून थेट पाण्याचे वितरण; ग्रामपंचायत सदस्याचा घरचा आहेर

**कर्जत : बातमीदार**

कर्जत तालुक्यातील कोल्हारे ग्रामपंचायतीमध्ये नव्याने नागरीकरण झालेल्या वसाहतीसाठी नळाचे पाणी देण्याची ग्रामपंचायतची योजना आहे, मात्र नदीमधून ते पाणी थेट नवीन वसाहत भागात जलवाहिनीमधून वितरित केले जात आहे. उल्हास नदीमधील हिरवेगार तवंग असलेले पाणी वितरीत केल्याने रोगराई पसरण्याची शक्यता आहे, असा आरोप ग्रामपंचायत सदस्य विजय हजारे यांनी केला आहे. ग्रामपंचायतीमधील सत्ताधारी गटाला घरचा आहेर एका ग्रामपंचायत सदस्याने दिला आहे.



कोल्हारे ग्रामपंचायतीमध्ये कोल्हारे, धामोते आणि बोपेले येथे असलेली निवासी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर नागरीकरण झाले आहे. या भागाला नेरळ नळपाणी योजनेतून दिले जायचे, मात्र आता कोल्हारे ग्रामपंचायतीने आपल्या भागातील रहिवाशांना पाणी देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी कोल्हारे ग्रामपंचायतहने जलवाहिनी टाकण्याचे काम हाती घेतले आहे, मात्र ती जलवाहिनी टाकताना जुन्या नळपाणी योजनांची पाणी उचलण्याची क्षमता लक्षात तपासण्याचे काम लघुपाटबंधारे विभागाने करण्याची गरज असतानासह कोल्हारे ग्रामपंचायतीने जलवाहिन्या टाकल्या आहेत. त्या जलवाहिन्या टाकण्यासाठी रस्ते खोदले आहेत. तब्बल चार ठिकाणी नेरळ-कळंब रस्ता खोदण्यात आला असून काळ्या रंगाच्या रबरी जलवाहिन्या नवीन वसाहत भागात पाणी देण्यासाठी टाकल्याचा आरोप सदस्य विजय हजारे यांनी केला आहे.

नवीन वसाहतीमधील भागासाठी धामोते येथील धनेश्वरी येथे उल्हासनदीमधून पाणी उचलण्यात आले आहे. तेथे असलेल्या धामोते नळपाणी योजनेच्या विहिरींमधून ते पाणी जलवाहिनीतून न सोडता थेट नदीमधून उचलून जलवाहिनीमधून घरोघरी पाठवले जात आहे. त्यात ज्या उल्हासनदीमधून पाणी उचलले आहे त्या उल्हासनदीला गेल्या काही वर्षांपासून जलपर्णी आणि शेवाळीने व्यापले आहे. तेथील योजनेत जलशुद्धीकरण केंद्रदेखील नाही आणि त्यामुळे नागरी भागाला अशुद्ध पाण्याचा पुरवठा केला जात आहे, असा आरोप कोल्हारे ग्रामपंचायतचे सदस्य विजय हजारे यांनी केला आहे. यामुळे रोगराई पसरण्याची भीतीही त्यांनी व्यक्त केली.

याबाबत गरमपंचायत सदस्य विजय हजारे यांनी, थेट नदीमधून कोणत्या अधिकारात पाणी उचलले जात आहे? यासाठी पाटबंधारे विभागाने कधी परवानगी दिली आणि थेट नदीमधून पाणी उचलण्याची परवानगी दिली आहे काय? याची माहिती पाटबंधारे खात्याने द्यावी, अशी मागणी केली आहे. ग्रामपंचायत सदस्य हजारे यांनी याबाबत आवाज उठल्याने कोल्हारे ग्रामपंचायतीसाठी हा घरचा आहेर दिला आहे.

## रमजाननिमित्ताने खजुराची आवक वाढली

**महाड : प्रतिनिधी**

मुस्लिम बांधवांच्या पवित्र रमजान महिन्याला सुरुवात झाली असून या महिन्यात ज्या फळाला सर्वाधिक मागणी अशा खजुराची आवक महाड बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर झाली आहे. सुमारे १०० रुपयांपासून दोन हजार रुपये किलोपर्यंतचा खजूर बाजारात मिळत आहे. तरीही वाढत्या महागाईत गोरगरिबांसाठी मात्र खजुराची गोडी आंबटच जाणवत आहे.



मुस्लिम धर्मात पवित्र गणल्या गेलेल्या रमजान महिन्याला सुरुवात झाली आहे. या महिन्यात केल्या जाणाऱ्या रोजांचा उपवास सोडताना घेण्यात येणाऱ्या आहारात खजुराला अनन्यसाधारण महत्त्व आहे. यामुळे रमजानला सुरुवात होण्याआधीच खजुराची मोठी आवक बाजारात झाली आहे. मुळातच खजूर हा अरब राष्ट्रात सर्वाधिक घेतले जाणारे पिक आहे. वाळवंटी प्रदेश राजस्थानमध्येदेखील काही प्रमाणात खजूर पिक घेतले जाते, मात्र इराक, इराण, मस्कत, सौदी अरेबिया या ठिकाणाहून आलेल्या खजुराला मागणी आहे. या खजुरातील अजवा या प्रकाराला अधिक मागणी असून याची किंमतदेखील १८०० ते २००० प्रती किलोपर्यंत आहे. इराकमधून आलेला झाहीदी, इराणमधील इलिन, मझाफाती याचबरोबर मस्कत मधील फरद आणि सौदीमधील अजवा, मबरूम, सुक्कारी, सूगाई आदी प्रकार बाजारात पहावयास मिळत आहेत. महाड शहरात बाजारात किमान ५० टन खजूर विक्री झाला असावा असे खजूर विक्रेते मुनाफ करबेलकर यांनी सांगितले.

**खजूर रमजान महिन्यात उपवास सोडताना खाल्लाच जातो. यामुळे रमजानमध्ये खजुराला मागणी आहे. विविध जातीचा खजूर बाजारात सध्या उपलब्ध आहे.**

**-रशीद काळसेकर, खजूर विक्रेते महाड**

## बोरघाटात दुचाकी अपघातात महिला ठार; तरुण जखमी

**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर बोरघाट येथे सायमाळजवळ झालेल्या दुचाकी अपघातात महिला ठार झाली असून तिचा साथीदार दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला आहे. हा अपघात रविवारी (दि. १०) घडला. जखमी तरुणाला पुढील उपचारासाठी नवी मुंबई येथे हलविण्यात आले आहे.

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरून तरुण-तरुणी दुचाकीवरून रविवारी भरधाव वेगात जात होते. बोरघाट येथे सायमाळजवळ येथे अतिवेगामुळे चालकाचे नियंत्रण सुटल्याने दुचाकी रस्त्याच्या बाजूला असलेल्या लोखंडी खांबावर आदळली. यामुळे मागे बसलेली महिला खांबावर आदळल्याने तिला पोटावर गंभीर झाली व जागीच ठार झाली. मृत महिलेचे नाव स्नेहा सातदिवे (२७) असे आहे. तर दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला आहे.

# खालापुरात पोलिसांचा कारखान्यातील महिलांशी संवाद

## महिलांसंबंधी गुन्हे व अत्याचार कायदे मार्गदर्शन

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील विविध कारखाने व आस्थापनांमध्ये काम करणाऱ्या महिलांशी रायगड पोलिसांनी भेट देत संवाद साधला. त्याचप्रमाणे या महिलांना त्यांच्यासाठी असणाऱ्या कायद्यांबाबत माहिती दिली.



खालापुरात महिला अत्याचारात वाढ तसेच कामाच्या ठिकाणी विनयभंग, अपमानास्पद वागणूक मिळत असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले होते. रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांनी तातडीने वृत्ताची दखल घेत, त्या अनुषंगाने खालापूर तालुक्यात बहुसंख्येने महिला कर्मचारी काम करीत असलेल्या कारखान्यात प्रत्यक्ष परिस्थिती आणि महिलांच्या समस्या जाणून घेण्यासाठी सहाय्यक महिला पोलीस निरीक्षक उत्कर्षा देशमुख, महिला पोलीस कर्मचारी मानसी पाटील आणि स्थानिक पोलीस ठाणे पथकासह कारखान्यांना शनिवारी (दि. ९) भेट दिली.

तालुक्यातील कोपरान फार्मा, मोहपाडा येथील जय प्रिसिजन आणि पाताळगंगा नवीन औद्योगिक वसाहतीत कॅमलिन कारखान्यात सपोनि. उत्कर्षा देशमुख यांनी भेट दिली. या ठिकाणी महिला कामगारांशी संवाद साधत महिलांना सायबर गुन्हे, महिलांसंबंधी गुन्हे व महिला अत्याचार कायद्यांबाबत सपोनि. उत्कर्षा देशमुख यांनी माहितीपर मार्गदर्शन केले. या वेळी रसायनी पोलीस ठाण्यातील महिला पोलीस कर्मचारी जाधव यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.

**रायगड पोलीस अधीक्षकांच्या सूचनेनुसार खालापूर येथील तीन कारखान्यात महिला कामगारांशी संवाद साधला व मार्गदर्शन केले.**

**-उत्कर्षा देशमुख, सहाय्यक पोलीस निरीक्षक, खालापूर**

## मुरूड एकदरा येथे श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा

**मुरुड : प्रतिनिधी**

तालुक्यातील एकदरा येथील श्रीराम मंदिरात एकदरा धर्नुधारी मंडळातर्फे कोळी बांधवांनी पारंपरिक पद्धतीने रामोत्सव अत्यंत उत्साहात साजरा केला. प्रतिवर्षाप्रमाणे श्रीराम मंदिराचे प्रांगणात हभप परशुराम बुवा उपाध्ये यांनी सुश्राव्य कीर्तन सादर केले.



मंदिर परिसरात विद्युत रोषणाई करण्यात आली होती. त्यामुळे परिसर उजाळून निघाला होता. उत्सवाकरीता अनेक राजकीय व श्रीराम भक्त मंडळींनीही हजेरी लावली होती. सरपंच रामकृष्ण आगरकर यांच्या हस्ते श्रीरामाच्या मूर्तीचा दुग्धाभिषेक करून पुजा करण्यात आली. त्यानंतर श्रीरामला पाळण्यात घालून पाळणागीत गाण्यात आले. सरपंचांच्या निवासस्थानी महाप्रसादाची सोय करण्यात आली होती. माणगाव येथील हभप परशुराम उपाध्ये यांनी किर्तनात श्रीराम जन्मोत्सव गाऊन सर्वांना मोहीत केले. सालाबादाप्रमाणे धनुर्धारी मंडळाचे युवा कार्यकर्त्यांच्या नेतृत्वा खाली श्रीरामाची पालखी तसेच सजवलेल्या रथांतून पौराणिक देखावे साकारून खालु-बाजासह भव्य मिरवणूक शहरातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आली.

## रेवदंड्यात आपत्ती व्यवस्थापन शिबिर

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा येथील भंडारी समाज हॉल येथे आपत्ती व्यवस्थापन शिबिर नुकतेच पार पडले. या शिबिरास आपत्ती व्यवस्थापन तज्ज्ञ जयपाल पाटील, साळाव जेएसडब्लू अग्निशामक दल प्रमुख संदिप ढापरे व रेवदंडा पोलीस ठाण्याचे मार्गदर्शन लाभले.



रायगड जिल्हा परिषद, रेवदंडा ग्रामपंचायत व रायगडचा युवक फांउडेशनच्या वतीने आपत्ती व्यवस्थापन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी साळाव जेएसब्लू कंपनीचे संदिप ढापरे, योग शिक्षक सुहास गाणू, रेवदंडा सरपंच, सदस्य, रेवदंडा पोलीस हवालदार अशोक पाटील, राकेश मेहत्तर, पोलीस शिपाई मनोज घुमरे, जेएसब्लूचे अग्निशामक दलाचे कर्मचारी विपीन चवरकर, अनिल बापलेकर, सुरज तांबडे, आपत्ती व सुरक्षा मित्र पुजा पेडणेकर व ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी आपत्ती व्यवस्थापन तज्ञ जयपाल पाटील यांनी, घर अथवा परिसरात आग लागली तर उपाययोजना, महिलांच्या सुरक्षेसाठी पोलिसांची मदत कशी घ्यावी, आपत्ती काळात पाणी व वीज यांचे नियत्रंण कसे मिळवावे आदींचे प्रात्यक्षिक दाखविले. तसेच साळाव जेएसडब्लू कंपनीचे अग्निशामक दलाचे मुख्य अधिकारी संदिप ढापरे यांनी सहकाऱ्यांसह आग आटोक्यात आणण्याचे प्रात्यक्षिक उपस्थितांना दाखविले.

## पोलीस आणि नागरिकांमध्ये समन्वय हवा

### निरीक्षक अनिल विभुते यांचे प्रतिपादन

**खोपोली : प्रतिनिधी**

पोलिसांच्या कामात नागरिकांचा सहभाग आवश्यक आहे, तरच पोलीस आपल्या कामात यशस्वी होतात. यासाठी पोलीस व नागरिकांत समन्वय असणे गरजेचे असल्याचे मत खालापूर पोलीस ठाण्याचे निरीक्षक अनिल विभूते यांनी मांडले.

छत्तिशी विभागातील वावोशी दूरक्षेत्र पोलीस ठाण्याच्या आवारात शांतता सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करताना विभूते यांनी नागरिकांनी आगामी रामनवमी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, हनुमान जयंती तसेच रमजान सण शांततेत साजरे करावेत, असे आवाहन विभूते यांनी येथे केले.

मोबाईलवरून चुकीच्या व्यक्तीशी संपर्क साधून त्यांच्या भूलथापांना बळी पडू नका, असे आवाहन करीत परिसरातील नागरिकांनी आपापल्या परिसरात प्रमुख चौकात, रिक्षा स्टँड परिसरात, सोसायटीमध्ये सीसीटीव्ही बसवावेत, यामुळे गुन्हेगारीवर आळा घालता येईल, असे सांगितले उपस्थित नागरिकांच्या विविध शंकांचेही त्यांनी निरसन केले. या वेळी वावोशी दूरक्षेत्र पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी त्याचप्रमाणे नागरिक उपस्थित होते.



## पावसाळ्यातील बेगमीसाठी गृहिणींची लगबग

### पापड, कुरडया, सांडगे, लोणची, मसाले बनविण्याचे काम सुरू

**पाली : प्रतिनिधी**

भारतीय खाद्य संस्कृतीत विविध लज्जतदार पदार्थांना विशेष महत्त्व आहे. त्यातच पावसाळ्यातील बेगमीसाठी उन्हाळ्यात करण्यात येणाऱ्या विविध पदार्थांची जंत्रीच आहे. बाजारात कडधान्य व सुकी मासळी खरेदीसाठी गर्दी वाढत आहे.

उन्हाळ्यात बहुतांश घरात पापड, कुरडया, चिकोड्या, शेवया, फेण्या, सांडगे, लोणची व मसाले या विविध पदार्थांसह वाळवणाचे पदार्थ सामुहिक व वैयक्तिकपणे तयार केले जातात. जिल्ह्यात आजही अनेक घरांमध्ये ही वाळवण संस्कृती जोपासली जात आहे. पापड, कुरडया, चिकोड्या, मिरगुंड, फणस व आंबा पोळी, मसाले, सांडगी मिरची विविध सरबत आदी पदार्थ तयार करण्यासाठी तर गावागावातील महिला एकत्र येतात. घरातील बच्चे कंपनीदेखील त्यांच्या मदतीला सज्ज असतात. तयार पापड, कुरडया, मिरगुंड, फणस व आंबा पोळी, सांडगी मिरची, लोणची, मसाले असे पदार्थ आप्तस्वकियांसह शेजाऱ्यांनादेखील हौसेने चवीसाठी दिले जातात. ही परंपरा व संस्कृती अजूनही टिकून आहे.

याबरोबरच अनेक घरांच्या अंगणात, पडवीत, छतावर, कौलावर किंवा पत्र्यावर कापलेल्या आंब्याच्या फोडी आंबोशी करण्यासाठी ठेवल्या जातात. त्याचबरोबर सुकी मच्छी तसेच कोकम सरबत बनविण्यासाठी बाटल्यांमध्ये कोकम ठेवले जाते. मसाल्यासाठी मिरची येथेच सुकविल्या जातात. पापड, सांडगी, कुरडया, चिकोड्या आदी घरीच बनविले व वाळविले जातात. अशी ही पावसाळ्याची बेगमी व वाळवण संस्कृती अखंडितपणे सुरू आहे.



(छाया : धम्मशील सावंत)

### सुक्या मासळीचीही साठवणूक

*पावसाळ्याच्या चार महिन्यांत भाजीपाला व मासळी यांची आवक कमी होते आणि त्यांचे भावदेखील वधारतात. अशा वेळी घरात साठवून ठेवलेले कडधान्य व सुकी मच्छी म्हणजे सर्वात चांगला पर्याय असतो. मासळीची आवक कमी, डिझेलचे व मजुरीचे वाढलेल्या दरांमुळे यावर्षी सुक्या मासळीचे भाव वाढले आहेत. तर कडधान्याचे भावदेखील वाढले आहेत. गोड व कडवे वालांना अधिक मागणी आहे. पावासाळ्यासाठी खेड्या-पाड्यातील अनेक जण या जिन्नसांची खरेदी करीत आहेत.*






**खोपोली : रामनवमीनिमित्त बाजारपेठेतून रविवारी सायंकाळी भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. ढोल-ताशांच्या गजरात, भगवे फेटे बांधलेल्या कार्यकर्त्यांनी परिसर फुलून गेला होता. रथामध्ये श्रीराम, सीता व लक्ष्मण यांची रूपे लहान बालकांनी साकारली होती.** (छाया : जयवंत माडपे)

STAFF REQUIRED

**Shree Hospital & ICU Care Center**

- **GENERAL DUTY MEDICAL OFFICERS :** M.B.B.S. (Reg. with Maharashtra Medical Council)
- **STAFF NURSE :** Qualification : G.N.M./B.Sc. Nursing.
- **O.T. TECHNICIAN :** Diploma / Graduate Opertion Theaters.
- **X RAY/E.C.G. TECHNICIAN**

**CALL / WHATSAPP :** 8655455655

**Contact :** 02143-232059/8605234974

**Email :** shreehospitalnewpanvel@gmail.com

**Address :** 105/106, 1st Floor, Shree Gurudatta Niwas, Near Balaji Temple, Matheran Road, Sukapur, New Panvel.

# डॉ. आंबेडकर जयंती उत्साहात, पण नियम पाळून साजरी करा

## पनवेल शहर पोलिसांचे आवाहन



**पनवेल : वार्ताहर**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सर्वांनी उत्साहात करावी, परंतु शासनाकडून निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांनी आयोजित बैठकीत मार्गदर्शन करताना केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या अनुषंगाने पनवेल शहर पोलीस ठाण्यात बैठक घेण्यात आली. या बैठकीत होणारे कार्यक्रम व निघणाऱ्या मिरवणुकींबाबत उपस्थितांना शासनाकडून निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांप्रमाणे मार्गदर्शन वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांनी केले. या बैठकीत स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंके यांनी सांगितले की, कोरोना काळामुळे मागील दोन वर्ष भीमसैनिकांना जयंती साजरी करता आली नाही, परंतु आता शासनाने सर्व निर्बंध दूर केल्यामुळे भीमसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. त्यामुळे सर्व मंडळांना आंबेडकर जयंती साजरी करण्याकरीता परवानगी देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली

या बैठकीला पनवेल शहरातील पंचशील नगर, नवनाथनगर, करंजाडे, वडघर, ओवळे सह अनेक ठिकाणचे पदाधिकारी, पोलीस पाटील कुणाल लोंढे, राज सदावर्ते यांच्यासह आदी उपस्थित होते.

# खारघर परिसरात अवैध दारू विक्री

**पनवेल : वार्ताहर**

दारूमुक्त असलेले खारघर शहर आता दारू युक्त म्हणून ओळखु लागलेले आहे. खारघर-कोपरा परिसरात अवैध पद्धतीने जोरात दारू विक्री केली जात आहे. कोपरा गाव, खारघर गाव, मूर्बी गाव, रांजनपाडा गाव, पेठ गाव या सर्व गावामध्ये ठिकठिकाणी बिंधास्तपणे दारू विक्री होत आहे, मात्र यावर कारवाई केली जात नाही.

कोपरा गावात सर्वांत जास्त गावठी दारू विक्री धंदे जोरात चालत आहेत. यावर कोणाचा वरदहस्त आहे हे गुलदस्त्यात आहे. खारघरमध्ये फुटपाथवर राहणारे भिकारी सर्वांत जास्त प्रमाणात असल्याने हे भिकारी, गर्दूल्ले दारू पिण्याकरिता कोपरा गावात येत असतात व दारू पिऊन रस्त्यावर कुठे ही पडतात. याकडे उत्पादन शुल्क विभाग आणि पोलिसांचे दुर्लक्ष होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. दारू विक्रेत्यांचे नाव पोलिसांकडे दिले तर आपले नाव उघड होईल या भीतीने नागरिक पुढे येण्यास घाबरत आहेत. या अवैध धंद्यांचा त्रास स्थानिक नागरिकांना होत असून या अवैध धंद्यांवर कारवाई करून आळा घालण्याची मागणी सर्वसामान्य नागरिकांमधून केली जात आहे.



खारघर-कोपरा परिसरात अनेक ठिकाणी बेकायदेशीर दारू विक्री चालू आहे. रात्रीच्या वेळी तळीराम बिंधास्त कुठेही बसून दारू पिण्याचा आनंद घेत आहेत. सर्वांच्या नजरेस पडणारे या अवैध धंद्यांकडे पोलिसांसह सर्वच प्रशासकीय यंत्रणा सोयीस्कर दुर्लक्ष करीत आहेत. या बेकायदेशीर दारू विक्रीवर कोणतीही मोठी कारवाई काही महिन्यांपासून झालेली नाही. अवैध धंदेवाल्यांवर कारवाई केली जात नसल्याने खारघर शहरात अवैध धंद्यांना उधाण आले आहे, परंतु याचा त्रास सर्वसामान्य नागरिकांना भोगावा लागत आहे.

# सोसायट्यांच्या अंतर्गत भागातील मल:निस्सारण वाहिन्यांची सफाई करा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

प्रभाग ७६मधील सानपाडा सेक्टर २, ३, ४, ८मधील गृहनिर्माण सोसायट्यांच्या अंर्तगत भागातील मल:निस्सारण वाहिन्यांची सफाई करण्याची मागणी भाजपचे सानपाडा नोडमधील युवा नेते पांडुरंग आमले यांनी महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्याकडे एका लेखी निवेदनातून केली आहे.

प्रभाग ७६मध्ये सानपाडा सेक्टर २, ३, ४ , ८ या परिसराचा समावेश होत आहे. या ठिकाणी सिडकोच्या गृहनिर्माण सोसायट्या, टॉवर व छोट्या गृहनिर्माण सोसायट्यांही आहेत. येथे अल्प व मध्य उत्पन्न गटातील रहीवाशी राहतात. महापालिका प्रशासनाकडून बाहेरील भागातील, रस्त्यावरील मल:निस्सारण वाहिन्यांची व चेम्बर्सची नेहमीच सफाई होते, पण सोसायटी अंतर्गत भागातील मल:निस्सारण वाहिन्यांची सफाई न झाल्याने वेगळीच समस्या निर्माण होते व स्थानिक

**भाजपच्या पांडुरंग आमले यांची पत्राद्वारे मागणी**

रहिवाशांना सांडपाण्याच्या, मैलाच्या दुर्गंधीचा सामना करावा लागून आरोग्यविषयक समस्याही निर्माण होतात. अंर्तगत मल:निस्सारण वाहिन्यांची समस्या निर्माण झाली तरी रहीवाशी आमच्याकडे व आम्ही पालिकेकडे पाठपुरावा करतो. सिडको सोसायट्यांमध्ये राहणारे रहीवाशी नवी मुंबई महापालिकेचे करदाते आहेत. त्यांना सुविधा पुरविणे महापालिका प्रशासनाचे कर्तव्य आहे. महिन्यातून किमान एकदा तरी गृहनिर्माण सोसायट्यांच्या अंर्तगत भागातील मल:निस्सारण वाहिन्यांची सफाई होणे आवश्यक आहे. आतून व बाहेरून मल:निस्सारण वाहिन्यांची सफाई झाल्यास दुर्गंधीचा सामना करावा लागणार नाही. पालिका प्रशासनाकडेही फारशा तक्रारी येणार नाहीत.

प्रभाग ७६ मधील सानपाडा सेक्टर २, ३, ४, ८ मधील गृहनिर्माण सोसायट्यांच्या अंर्तगत भागातील मल:निस्सारण वाहिन्यांची सफाई करण्यात यावी व तसे संबंधितांना निर्देश द्यावे, असे पांडुरंग आमले यांनी दिलेल्या निवेदनात नमुद केले आहे.

# लाखोंचा अपहार करून कंटनेरचालक फरार

**पनवेल : वार्ताहर**

चेन्नई येथून तळोजा येथे पोहचवण्याची जबाबदारी सोपविलेल्या कंटेनरचालकाने कंटेनेरमधील तब्बल २६ लाख रुपये किमतीचे डेल कंपनीच्या मॉनिटरचा अपहार केल्याचे उघडकीस आले आहे. शमीम खुर्शीद खान (वय २५) असे या कंटेनर चालकाचे नाव असून तळोजा पोलिसांनी त्याच्या विरोधात अपहाराचा गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरू केला आहे.




चेन्नई येथील ब्ल्यु डार्ट कंपनीचे मॅनेजर रणजित कुमार यांनी गत ३१ मार्च रोजी चैन्नई येथून तळोजा येथे ८०० डेल कंपनीचे मॉनिटरने भरलेले बॉक्स व २६ इतर मॉनिटरचे बॉक्स पोहोचविण्याची जबाबदारी सेंच्युरी कार्गो कॅरीअर प्रा.लि. या कंपनीच्या चेन्नई येथील कार्यालयाला दिली होती. त्यानुसार सेंच्युरी कार्गो कंपनीने शौकीन सनाब खुर्शीद खान या कंटेनर चालकाला ३२ फुटी ट्रेलरमध्ये मॉनिटरचे बॉक्स भरून ते तळोजा येथे पोहचविण्यास सांगितले होते, मात्र कंटेनरवर शौकिन खान हा चालक म्हणून न जाता, त्याने त्याचा भाऊ शमीम खान याला पाठवुन दिले. १ एप्रिल रोजी सायंकाळी शमीम याने चेन्नई येथून कंटेनरमध्ये मॉनिनटरचे बॉक्स भरल्यानंतर तो तळोजा येथे जाण्यासाठी निघाला होता, मात्र यादरम्यान, त्याने कंटेनरमधील तब्बल २६ लाख रुपये किंमतीचे ७० डेल कंपनीचे मॉनिटर बाहेर काढुन त्यांचा अपहार केला.

यानंतर त्याने ३ एप्रिल रोजी सायंकाळी त्याची मुलगी मयत झाल्याने मालाचा कंटेनर कर्नाटक धारवाड टोलनाक्याजवळील मेवाती ढाब्याजवळ थांबवुन आपल्या गावी जात असल्याचे कार्गो कंपनीतील सुपरवायझरला फोनवरुन सांगितले. त्यामुळे कार्गो कंपनीने हा कंटेनर तळोजा येथे आणण्यासाठी अबिद खान याला धारवाड येथे पाठवुन दिले. अबिद खान हा त्याच दिवशी रात्री धारवाड येथे पोहचल्यानंतर त्याने कंटनेचे सील व्यवस्थीत असल्याची खात्री करुन सदर कंटेनर दुसऱ्या दिवशी रात्री तळोजा येथे आणला. त्यानंतर कंटनेरमधील माल बाहेर काढण्यात आल्यानंतर त्यातील ७० डेल कंपनीचे मॉनिटर कमी असल्याचे आढळुन आले. त्यानंतर चालक शमीम खुर्शीद खान यानेच सदर कंटेनर मधील मॉनिटरचा अपहार करुन पलायन केल्याचे लक्षात आल्यानंतर कार्गो कंपनीच्या अधिकाऱ्याने तळोजा पोलीस ठाण्यात शमीमविरोधात तक्रार दाखल केली.

# श्री साईबाबा मंदिरात श्री रामनवमी विविध कार्यक्रमांनी साजरी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथील श्री साईबाबा मंदिरात रविवारी श्री रामनवमीचे औचित्य साधून विविध धार्मिक कार्यक्रम झाले. या वेळी भाविकांनी उपस्थित राहून प्रभू श्रीरामचंद्रांचा जयजयकार केला.

रामनवमीनिमित्त प्रथमच श्री रामकथा अर्थात श्री रामचरित्र मानस पठणाचे आयोजन करण्यात आले होते. अयोध्येतील दिव्यांशु महाराज आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी श्री रामकथा सादर केली. या वेळी पनवेल महापालिकेच्या महापौर डॉ. कविता चौतमोल व पत्रकार संजय कदम यांच्या हस्ते उपस्थित पंडितांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले तसेच सकाळपासूनच १४० विधवा माता भगिनींना महिन्याचे रेशन व ११० पंडितांना भोजन देण्यात आले.

रामनवीनिमित्त पहाटे यज्ञ व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती श्री साई नारायणबाबा आश्रम व श्री भगवती साई संस्थानचे चेअरमन खेमचंद गोपलानी, को-ऑर्डिनेटर रामथदानी आणि सचिव रामलाल चौधरी यांनी दिली.



**साईमंदिरात येऊन सर्वांचे दुःख, विवंचना नष्ट होतात. वेळोवेळी येथील प्रत्येक कार्यक्रमात मला सहभागी होता येते हे मी माझे भाग्य समजते. आजही येथील संस्थेचे पदाधिकारी व साईसेवक निस्वार्थीपणे येथे येणाऱ्या प्रत्येकाची सेवा करतात.**
**-डॉ. कविता चौतमोल, महापौर, पनवेल**

## खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयात आज पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालयाचा पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ सोमवारी (दि. ११) सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई विद्यापीठाचे माजी डीन तसेच मुख्य सल्लागार डॉ. विजय जोशी यांची उपस्थिती लाभणार असून जनार्दन भगत शिक्षण संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर हे समारंभाच्या अध्यक्षस्थानी असणार आहेत. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, कार्यकारी मंडळ सदस्य व पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, सचिव डॉ. एस. टी. गडदे तसेच पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

# आता नवी मुंबई महापालिका रुग्णालयातही सीटी स्कॅन



**महापालिकेच्या आरोग्य सुविधा खासगी संस्थेमार्फत चालवण्यापेक्षा त्या पालिकेनेच चालवल्या पाहिजेत. सीटी स्कॅनची सेवा लवकरच पालिकेमार्फत चालवली जाणार आहे. इतरही महागड्या सुविधा पालिकेच्या रुग्णालयामध्ये उपलब्ध केल्या जाणार आहेत.**
**-अभिजित बांगर, आयुक्त, नवी मुंबई महापालिका**

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महापालिकेने कोरोनोत्तर कालावधीत आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न केला. पालिकेच्या आरोग्य विभागामध्ये आतापर्यंत सोनोग्राफी, सीटी स्कॅन आदी सेवा खासगी संस्थेमार्फत पुरवल्या जात होत्या, तर विविध दुर्धर आजारांच्या तपासण्यांसाठी खासगी प्रयोगशाळांवर अवलंबून राहावे लागत होते. आता या यंत्रणा पालिकेकडे आल्या आहेत. त्यामुळे महागड्या तपासण्या आता पालिका रुग्णालयांत मोफत मिळणार आहेत. यासाठी पालिकेचे नियोजन सुरू असल्याचे आयुक्त अभिजित बांगर यांनी सांगितले.

नवी मुंबई महापालिकेने करोडो रुपये खर्च करून शहरातील माता-बाल रुग्णालयांचे रूपांतर सार्वजनिक रुग्णालयांमध्ये केले आहे, मात्र वर्षानुवर्षे रुग्णालयाच्या टोलेजंग इमारती केवळ फक्त शोभेच्या वस्तू ठरल्या होत्या; परंतु कोरोना काळात याच इमारतींमध्ये उत्तम आरोग्य सुविधा देण्याचा प्रयत्न केला. खासगी रुग्णालयांसारख्या चांगल्या सुविधाही पालिका रुग्णालयात मिळत आहेत. वाशी येथील पालिका रुग्णालयात सीटी स्कॅन सुविधा सुरू केली जात आहे. आतापर्यंत एका खासगी संस्थेच्या मदतीने पालिका ही सुविधा देत होती, परंतु कोरोनाकाळात सामाजिक दायित्व फंडातून पालिकेने सीटी स्कॅन यंत्रणा घेतली आहे. त्याचबरोबर नेरूळ, ऐरोली येथील रुग्णालयातही कोरोना काळात चांगल्या सुविधा निर्माण केल्या आहेत.

नेरूळ रुग्णालयातील पालिकेची प्रयोगशाळा विविध आजारांचे निदान व तपासणीसाठी उपयुक्त ठरली आहे. यापूर्वी पालिकेची स्वत:ची प्रयोगशाळा नसल्याने सामान्य रुग्णांची खासगी प्रयोगशाळेत लूट सुरू होती. भविष्यात पालिकेची प्रयोगशाळा सुरू झाल्यास सर्वसामान्यांची होणारी लूट थांबणार आहे.

# उद्योजक भाई पाटील यांच्या सर्व्हिस सेंटरचे उद्घाटन

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल जवळील कर्नाळा तारा विभागातील यशस्वी उद्योजक भाई पांडुरंग पाटील यांच्या अर्थ सर्व्हिस सेंटर आपटा फाटा, तारा येथे रविवारी (दि. १०) रामनवमीच्या शुभमुहुर्तावर उद्घाटन करण्यात आले.

या वेळी भाई पाटील यांच्यासह जितेंद्र पाटील, दीपक पाटील, हरेश्वर पाटील, दिनेश पाटील, राजेंद्र म्हात्रे, संदीप पाटील, अजय पाटील, हेमंत पाटील, हरेश पाटील, पंढरी गायकर, ज्ञानेश्वर भोईर, विनायक पाटील, जीवन टाकले, संतोष पाटील आदि उपस्थित होते. या सर्व्हिस सेन्टरमध्ये कार वॉशिंग, कार पॉलिशिंगसह इतर सर्व गाडी संबंधातील कामे या ठिकाणी होणार असल्याची माहिती भाई पाटील यांनी दिली.




## रामनवमीनिमित्त रामरक्षा पाठांतर अभ्यास वर्ग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या नगरसेविका रूचिता लोंढे यांच्या वतीने रामनवमी विशेष रामरक्षा पाठांतर अभ्यासवर्गाचे आयोजन करण्यात आले आहे.

या अभ्यासवर्गामध्ये फक्त प्रभाग क्रमांक १९ मधील मुलामुलींना सहभागी होता येईल. वयोगट ८ ते १२ वर्षांखालील असून सहभागी मुलामुलींना प्रमाणपत्र देण्यात येईल. या अभ्यासवर्गासाठी १३ एप्रिल २०२२ पर्यत नावनोंदणीसाठी सुरू राहील. हा अभ्यास वर्ग १० दिवसाचा असेल. अधिक माहितीसाठी अवधूत जोशी (८०८०५७२२२१) व https://forms.gle/CadMGqt2kKwP5Jhn9 येथे संपर्क साधावा, असे आवाहन नगरसेविका रूचिता लोंढे यांनी केले आहे.

# बेलापुरात श्रीराम जन्मोत्सव साजरा



**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

चैत्र शुद्ध नवमीच्या दिवशी अर्थात रविवारी (दि. १०) नवी मुंबईतील बेलापूर गावात श्रीराम जन्मोत्सव सोहळा मोठ्या थाटात झाला. गुढीपाडव्यापासून सुरू झालेल्या या सोहळ्याची सांगता हनुमान जयंती उत्सवाने होणार आहे.

बेलापूर गावात श्रीराम जन्मोत्सवाची परंपरा दीडशे वर्षांपासून जपली आहे. श्रीराम जन्म सोहळ्यास रविवारी बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे, माजी महापौर संजीव नाईक, जयवंत सुतार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

आजच्या फेस्टिव्हल्सच्या जमान्यातही नितांत श्रद्धा आणि साधेपणाने साजरा होणाऱ्या बेलापूरच्या श्री राम जन्मोत्सवाने मराठमोळी परंपरा जपल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले. त्यांनी उत्सवाला एक लाख रुपये देणगी दिली. मंदिराच्या पुढच्या बाजूस अंदाजित रुपये पंचवीस लाख रकमेची पत्रा शेड उभारून देण्याचे आश्वासन आमदार मंदा म्हात्रे यांनी उत्सवाच्या निमित्ताने दिले. दुपारी कुस्त्यांचा फडदेखील रंगला. विजेत्याला बेलापूर केसरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# रायगडमधील शाळांवर महावितरणची कारवाई

## एक हजार ५४९ शाळांचा वीजपुरवठा केला खंडित

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

**रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या माध्यमातून चालवण्यात येणाऱ्या शाळांनी त्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानातून वीजबिल भरण्यात दिरंगाई केल्याने एक हजार ५४९ शाळांचा वीजपुरवठा महावितरणने खंडित केला आहे. ६७९ शाळांचा वीजपुरवठा कायमस्वरूपी बंद, तर ८७० शाळांवर तात्पुरती कारवाई करण्यात आली आहे. यामुळे या शाळांमधील विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात लोटले गेले आहे.**

राज्य विधानमंडळाच्या नुकत्याच पार पडलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांचा वीजपुरवठा खंडित करण्यासंदर्भात भाजपचे नागपूर विभागीय शिक्षक मतदारसंघाचे आमदार नागो गाणार यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यावर अधिकची माहिती ऊर्जामंत्री नितीन राऊत यांनी गाणार यांना एका पत्राद्वारे दिली असून त्यात रायगड जिल्ह्यातील एक हजार ५४९ शाळांची वीज खंडित करण्यात आल्याचे म्हटले आहे.

जिल्हा परिषदेच्या ६७९ शाळांची बिलाची थकबाकी अनेक वर्षांपासून असल्याने त्यांची वीज कायमस्वरूपी खंडित करण्यात आली आहे. ८७० शाळांचा वीजपुरवठा तात्पुरता खंडित करण्यात आल्याचे ऊर्जामंत्र्यांनी नमूद केले आहे. मात्र यामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात गेले आहे.

वीजपुरवठा खंडित करण्यात आलेल्या सर्वाधिक शाळा पेण तालुक्यातील आहेत. तेथील ११८ शाळांची वीज कायमस्वरूपी खंडित करण्यात आली आहे. त्या खालोखाल सुधागडातील ९१, महाडमधील ७४ आणि पोलादपुरातील ५७ शाळांचा समावेश आहे. कर्जत तालुक्यातील ५१, रोहा तालुक्यातील ३२, तळा १९, मुरूड ३२, माणगाव २६, श्रीवर्धन ४२, पनवेल ४५, म्हसळा २१ आणि उरण तालुक्यातील ११ शाळांची वीज बंद करण्यात आली आहे. वीज खंडित करण्यात आलेल्या सर्वांत कमी सहा शाळा खालापूर तालुक्यातील आहेत.

*विद्यार्थ्यांच्या भवितव्याचे काय?*

***प्राथमिक शाळांना सार्वजनिक सेवा (अ) वर्गवारी अंतर्गत वीज आकारणी करण्यात येते. शाळांना लागू होणारे बिल घरगुती वर्गवारीतील दराच्या तुलनेत कमी आहेत. त्यामुळे महावितरणने वीज देयके वेळेवर भरणे शाळांची जबाबदारी असल्याचेही नितीन राऊत यांनी म्हटले आहे. मात्र यामुळे आता विद्यार्थ्यांनी शिकायचे कसे? असा प्रश्न पालकांमधूनही उपस्थित केला जात असून नाराजी व्यक्त होत आहे.***




## खंडाळा घाटात भरधाव टेम्पोची दोन वाहनांना धडक

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर शनिवारी (दि. ९) रात्री बोरघाटात भरधाव टेम्पोने विरूद्ध दिशेला जाऊन कार व पिकअप टेम्पोला धडक दिली. या अपघातात एकूण आठ जण जखमी झाले आहेत. या अपघातात अन्य वाहनेही बाधीत झाली आहेत.

**अपघातात आठ जण जखमी**

मुंबई-पुणे जुन्या राष्ट्रीय महामार्गावर खंडाळा घाटात अंडा पॉईंटजवळ पुण्याहून मुंबईला जाणाऱ्या आयशर टेम्पोचा ब्रेक निकामी झाल्याने, चालकाचा वाहनावरील ताबा सुटला. त्यामुळे आयशर टेम्पोने विरुद्ध दिशेने येणाऱ्या पिकप व कारला जोरदार धडक दिल्याने अपघात झाला.

आयशर टेम्पोमधील कामगार जगदेव पासवान, राजेश कुमार, रामचेत यादव, कमरूड जामा हे कामगार तसेच अन्य वाहनांतील प्रवासी असे मिळून एकूण आठ जण जखमी झाले आहेत.

सर्व जखमींना तातडीने खोपोलीतील रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. हा अपघात शनिवारी रात्री नऊच्या दरम्यान घडला आहे.

अपघात घडताच महामार्ग पोलीस, आयआरबी यंत्रणा, देवदूत, डेल्टा फोर्स, अपघातग्रस्त टीम, सर्व सदस्यांनी मदतकार्यात भाग घेऊन प्रथम जखमींना खोपोलीतील रुग्णालयात दाखल केले. त्यानंतर अपघातग्रस्त वाहने रस्त्यातून बाजूला करून वाहतूक पूर्ववत करण्यात मदत केली. या अपघाताबाबत खोपोली पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.





## महागाईमुळे गृहिणींना मिरचीचा ठसका

### तरीही कर्जत, नेरळच्या बाजारात मसाल्याच्या पदार्थांसाठी गर्दी

**कर्जत : बातमीदार**

कर्जत आणि नेरळच्या बाजारपेठेत मिळणारी मिरची विशेष आवडीची आहे. या दोन्ही बाजारपेठेत मिळणारी मिरची उपलब्ध झाली असून बाजारपेठ गृहिणींच्या गर्दीने फुलली आहे. महागाईच्या जमान्यात दुकाने कमी झाली असली तरी आवक मात्र तेवढीच आहे.

उन्हाळ्याला सुरुवात झाली की, महिलांना वेध लागतात ते पावसाळ्यात लागणाऱ्या वस्तूंची साठवण करण्याचे. जेवणातील महत्त्वाचा घटक भाजी आणि भाजीसाठी लागणारा मसाला महिला स्वत: जातीने लक्ष देऊन बनवून घेतात. वेगवेगळ्या प्रकारच्या मिरचीसाठी कर्जतची बाजारपेठ ओळखली जाते. महाराष्ट्रातील मिरचीची सर्वात मोठी बाजारपेठ समजल्या जाणाऱ्या कर्जतच्या बाजारपेठेत विकली जाणारी मिरची ही प्रामुख्याने आंध्र प्रदेश आणि कर्नाटक राज्यातून येते. मिरचीसोबत मसाल्याचे पदार्थ त्यात हळद, गरम मसाले यांची खरेदी मोठ्या प्रमाणात होते.



पूर्वी कर्जत बाजारपेठेत मिरची विक्रेत्यांची दुकाने मोठ्या प्रमाणात होती. त्या मानाने सध्याच्या परिस्थितीत दुकाने कमी झाली आहेत. कर्जतच्या मिरची गल्लीत संकेश्वरी, गंटूर, लवंगी, अंकुर, काश्मिरी, ढोबळी, तेलपरी, बेडगी या जातीची मिरची विक्रीसाठी येते. महागाई आणि किरकोळ वाढलेले भाव याचा कोणताही परिणाम कर्जतच्या या प्रसिद्ध असलेल्या बाजारपेठेवर पडला नाही. कारण चार महिन्यांच्या मिरची हंगामात तब्बल ५००-६०० पोते मिरचीची विक्री होते. कोकणातील मांसाहारी मंडळी ही प्रामुख्याने गंटूर आणि लवंगी या मिरचीला सर्वाधिक प्राधान्य देतात. नेरळ या लहान बाजारपेठेतदेखील काही दुकाने आजही मसाल्याचे पदार्थ आणि मिरची विक्रीसाठी प्रसिद्ध आहेत.

**यंदा मिरची गेल्या वर्षीपेक्षा महाग झाली आहे हे खरे आहे. असले तरी महागाईचा कोणताही परिणाम मिरची विक्रीवर झालेला दिसून येत नाही. कर्जतच्या बाजारपेठेत मिरचीच्या चवीची खात्री ग्राहकांना मिळत असल्याने आणि कोणताही गिऱ्हाईक तक्रार घेऊन येत नसल्याने दरवर्षी जुने गिऱ्हाईक कायम राहून नवीन गिऱ्हाईकांची भर पडलेली दिसून येते. हेच आमच्या कर्जतच्या सर्व व्यापाऱ्यांचे दोन पिढ्यांच्या सचोटीचे यश आहे.**

**-जयंतीलाल जोहारमल परमार, मिरचीचे जुने विक्रेते**

## मुरूड समुद्रकिनारी दोन कासव मृतावस्थेत

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरुड समुद्रकिनाऱ्यावर रविवारी (दि. १०) सकाळच्या दरम्यान ग्रीन टर्टल जातीचे दोन मोठे कासव मृतावस्थेत आढळले आहेत. ग्रीन टर्टल ही कासवाची जात दुर्मिळ असून अशा दुर्मिळ कासवांचा मृत्यू झाल्याने निसर्गप्रेमींकडून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

नुकतेच काही दिवसांपूर्वी श्रीवर्धन तालुक्यात मोठा व्हेल मासा सापडला होता. तद्नंतर काही दिवसांच्या अंतराने मुरूड समुद्रकिनारी दोन कासव मृतावस्थेत सापडल्याने सर्वत्र चिंता व्यक्त करण्यात येत आहे. जलचर प्राण्यांचे मृत्यू का होत आहेत, यामागचे कारण काय यासाठी राज्य शासनाने विशेष लक्ष देऊन यावर प्रतिबंध आणणारे उपाय करावेत, अशी जनतेमधून मागणी होत आहे.

रविवारी सकाळीही विश्रामबागेसमोरील एक तर दुसरा कासव काही अंतरावर समुद्रकिनाऱ्यावर कुजलेल्या अवस्थेत सापडल्याने फिरण्यासाठी आलेल्या पर्यटक व स्थानिक नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.



**याबाबत प्रादेशिक विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी प्रशांत पाटील यांना संपर्क साधून या ठिकाणी दोन कासवे आली असल्याची माहिती देण्यात आली. त्यांनी तातडीने वनरक्षक पाठवून सदरील कासवांचे अंत्यसंस्कार करणार असल्याचे सांगितले.**

## खालापुरात कंपनीच्या छतावरून पडून दोन जण गंभीर जखमी

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील स्टिल कारखान्यात छतावर चढून काम करीत असताना पत्रा तुटल्याने दोन कामगार गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे.

खोपोली-पेण मार्गावर खालापूर हद्दीत उत्तम स्टिल कारखाना असून श्याम किशोर सिंग (वय ३३) आणि छोटू लोहरा (वय २२ रा. खरसुंडी, ता. खालापूर) दोघे जण छतावर चढून काम करीत असताना छताचा पत्रा अचानक तुटला. त्यामुळे दोघेही खाली पडून दोघांनाही जबर दुखापत झाली. कामाच्या ठिकाणी कारखाना प्रशासकांनी सुरक्षितता न घेता कामगारांची व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात येईल, हे माहित असतानादेखील दुर्लक्ष केले. त्यामुळे अपघात घडल्याचे सांगण्यात येत असून याबाबत भादंवि. कलम ३३८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोसई एस. आरोटे हे करीत आहे.

## खाटीक समाजातर्फे पद्मश्री डॉ. आप्पासाहेब आणि सचिनदादा धर्माधिकारी यांचा सन्मान

**कर्जत : बातमीदार**

निरूपणाच्या माध्यमातून समाजात क्रांती घडविणारे पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी आणि सचिनदादा धर्माधिकारी यांचा अखिल भारतीय खाटीक समाज संघटनेच्या वतीने सन्मान करण्यात आला. तसेच संघटनेचे पदाधिकारी यांच्याकडून जाहीर सत्कार सोहळ्याला परवानगी देण्याची विनंतीही करण्यात आली आहे.


अखिल भारतीय खाटीक समाज संघटना महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने रेवदंडा येथे पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी आणि सचिनदादा धर्माधिकारी यांची भेट घेण्यात आली. महाराष्ट्र भूषण आप्पासाहेब धर्माधिकारी यांना युरोपियन इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीचा द लिजंड ऑफ द इयर पुरस्कार प्राप्त झाल्याने आणि सचिनदादा धर्माधिकारी यांना इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीची मानद डॉक्टरेट पदवी मिळाली आहे. त्याबद्दल अखिल भारतीय खाटीक समाज संघटना महाराष्ट्र प्रदेश यांच्यावतीने सन्मान करण्यात आला. संघटनेचे अध्यक्ष संजय



घोलप यांच्या आप्पासाहेब आणि सचिनदादा धर्माधिकारी यांचा घोंगडी, पुणेरी पगडी, शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच अखिल भारतीय खाटीक समाज संघटनेतर्फे आपला दर्शन सोहळा आणि सत्कार सोहळा नियोजन करण्याबाबत डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांनाही मान्यता द्यावी, अशी विनंती करण्यात आली.

## रामनवमीनिमित्त रायगडात रामनामाचा जयघोष





**अलिबाग : प्रतिनिधी**

'राम जन्माला सखे, राम जन्माला..' दोन वर्षे कोरोनाचा भीतीने सर्वच धार्मिक सण अगदी नियमात आणि बंधनात साजरे झाले. या वर्षी मात्र कोरोनाचा कहर ओसरला आणि जीवन पुन्हा पूर्वीसारखे सुरू झाले. रविवारी (दि. १०) रामनवमीचा उत्सत्वदेखील कोणतेही बंधन न लावता साजरा करण्यात आला.

रायगडात ठिकठिकाणी रामनवमी उत्सवाच्या सात दिवस आधी राममंदिरात सप्ताह साजरा झाला. तर रविवारी सकाळपासून धार्मिक विधी पार पडले. दुपारी रामजन्माचे कीर्तन झाले. त्यानंतर दुपारी साडेपार वाजता जन्मोत्सव साजरा झाला. दिवसभर भजन आणि इतर कार्यक्रम पार पडले. रात्री पालखी मिरवणूक काढण्यात आली. रायगडात जवळपास ९० ठिकाणी पालख्या काढण्यात आल्या.

अलिबाग शहरातील ब्राह्मण आळीसह वरसोली येथील पुरातन राममंदिरातही दरवर्षीप्रमाणे रामजन्मोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. या वेळी मोठ्या संख्येने भाविकांनी गर्दी केली होती. तालुक्यातील रेवस, नवखार, आवाससह इतर गावामध्ये रामनवमी साजरी झाली.

रामनवमीच्या निमित्ताने साई मंदिरातसुद्धा जन्मोत्सव साजरा करण्यात आला. राम मंदिर आणि साई मंदिरावर आकर्षक फुलांची आणि विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

### श्री काळभैरव मंदिरात रामजन्मोत्सव

**मरूड : रामप्रहर वृत्त**

शहरातील कित्ते भंडारी समाजाच्या श्री काळभैरव मंदिरात रामनवमी उत्साहात साजरी करण्यात आली. तब्बल दोन वर्षांच्या प्रदीर्घ काळानंतर या मंदिरात मोठ्या संख्येने श्रीराम भक्त उपस्थित होते.

यादिवशी बुवा सुधाकर पाटील यांनी कथन केलेल्या प्रभू श्रीरामाच्या चरित्राचे सुमधुर स्वरातील कथेने श्रोत्यांना मंत्रमुग्ध करून टाकले. श्री काळभैरव मंदीराचे पुजारी सुधाकर खेडेकर यांच्या हस्ते प्रभू श्रीरामाच्या मूर्तीची विधिवत पूजाअर्चा व अभिषेक करण्यात आला. त्यानंतर श्री राममूर्ती विधीवत पाळण्यात ठेवून सुवासिनींच्या हस्ते पाळणा घेण्यात आला. काळभैरव मंदिर पंचकमिटी, अध्यक्ष व विश्वस्त मंडळाने या सोहळ्याचे आयोजन केले होते.



## कर्जत तालुक्यात रामनवमी उत्साहात



**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील अनेक गावांमध्ये श्री राम मंदिरे आहेत. या मंदिरांमध्ये रामजन्मोत्सवानिमित्त रविवारी (दि. १०) विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. गेली दोन वर्षे कोरोनाच्या संकटामुळे हा उत्सव साजरा करण्यात आला नव्हता त्यामुळे यंदा रामजन्मोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला.

यंदा रविवार असल्याने सर्वच ठिकाणी भाविकांनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शवून प्रतिसाद दिला. तालुक्यातील दहिवली, साळोख, बेंडसे, कडाव, माथेरान, नेरळ, कर्जत येथील कपालेश्वर मंदिर आदी ठिकाणी रामनवमीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दहिवली येथील श्री विठ्ठल संस्थांच्या श्री राममंदिरातही मोठ्या प्रमाणात गर्दी होती.

श्री रामपंचतनच्या मंदिरात पहाटे ब्रह्मचैतन्य उपासना केंद्राच्या सदस्यांनी काकड आरती केली त्यानंतर महापूजा, अभिषेक, रामजन्माचा सोहळा संपन्न होतांना पाळणा, रामरक्षा, रामपाठ झाल्यानंतर श्री रामाच्या मूर्तीचे दर्शन प्रत्येक भाविकाला जागेवर नेऊन देण्यात आले. कोकण आळीतील विजय जिनगरे यांच्या निवासस्थानी तर साळोख येथील कृष्णा कदम यांच्या निवासस्थानीसुद्धा रामनवमी उत्सव संपन्न झाला. कडाव येथील श्री बाल दिगंबर गणेश संस्थानच्या श्री राम मंदिरात हभप श्रीराम पुरोहित यांनी तीन दिवस प्रवचन सेवा केली.

महाप्रसादानंतर श्रीरामाची पालखीतून मिरवणूक काढण्यात आली. या प्रसंगी अध्यक्ष बळवंत घुमरे, सचिव विलास दांडेकर, खजिनदार मनोहर दांडेकर, भालचंद्र घुमरे, सुधीर पोतदार विलास मुरकुटे, मोहन पोतदार आदींसह दहीवलीकर मोठ्या संख्येने उपस्थित होते. बेंडसे, कडाव, साळोख, माथेरान येथेही रामनवमी उत्साहात साजरी करण्यात आली.

# हैदराबादचा विजयी अभिषेक

## चेन्नईवर सहज मात

नवी मुंबई : प्रतिनिधी

युवा सलामीवीर अभिषेक शर्माने (५० चेंडूंत ७५ धावा) केलेल्या अप्रतिम खेळीच्या जोरावर सनरायजर्स हैदराबादने शनिवारी आयपीएलमध्ये झालेल्या दुसऱ्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जला आठ गडी आणि १४ चेंडू राखून शह दिला. नवी मुंबईतील डॉ. डी. वाय. पाटील स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात चेन्नईने दिलेले १५५ धावांचे आव्हान हैदराबादने १७.४ षटकांत पूर्ण करीत हंगामातील पहिल्या विजयाची नोंद केली, तर चार सामन्यांनंतर गतविजेत्या चेन्नईची विजयाची पाटी कोरीच राहिली.

१५५ धावांचा पाठलाग करताना सलामीवीर अभिषेक आणि कर्णधार केन विल्यम्सन (४० चेंडूंत ३२ धावा) यांनी ८९ धावांची भागीदारी रचली. मग विल्यम्सन बाद झाल्यावर अर्धशतकवीर अभिषेक (५० चेंडूंमध्ये तीन षटकार आणि पाच चौकारांनिशी ७५ धावा) आणि राहुल त्रिपाठी (१५ चेंडूंत नाबाद ३९) यांनी जोरदार फटकेबाजी केली. अभिषेक बाद झाल्यानंतर तिसऱ्या विकेटसाठी निकोलस पूरन फलंदाजीसाठी आला. त्याने नाबाद पाच धावा केल्या. शेवटी हैदराबादने आठ गडी राखून चेन्नईवर विजय मिळवला.





तत्पूर्वी, चेन्नईने २० षटकांत ७ बाद १५४ अशी धावसंख्या उभारली. रॉबिन उथप्पा (१५) आणि ऋतुराज गायकवाड (१६) अपयशी ठरल्याने चेन्नईची २ बाद ३६ अशी स्थिती होती. त्यानंतर मोईन अली (४८), अंबाती रायडू (२७) यांनी चांगले योगदान दिले.

# बंगळुरूचा मुंबईवर दणदणीत विजय

पुणे : प्रतिनिधी

आयपीएलच्या पंधराव्या हंगामात शनिवारी झालेल्या पहिल्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने मुंबई इंडियन्सवर सात गडी राखून दणदणीत विजय मिळवला. मुंबईने दिलेल्या १५१ धावांचे लक्ष्य रॉयल चॅलेजर्स बंगळुरूने आठ गडी राखून गाठले. या पराभवामुळे मुंबईने सलग चौथा सामना गमावला आहे.

मुंबईने दिलेले १५२ धावांचे लक्ष्य गाठण्यासाठी बंगळुरूकडून सलामीला आलेले फाफ डू प्लेलीस आणि अनुज रावत या जोडीने ५० धावांची भागिदारी केली. प्लेलिसने १६ धावा करून बाद झाला. दुसऱ्या विकेटसाठी आलेल्या विराट कोहलीने चांगली फलंदाजी केली. दुसरीकडे रावत सुरुवातीपासून मोठे फटके मारत होता. त्याने ४७ चेंडूमध्ये सहा षटकार आणि दोन चौकार लगावत ६६ धावा केल्या, तर कोहलीने ३६ चेंडूंमध्ये पाच चौकारच्या जोरावर ४८ धावा केल्या. शेवटी २० चेंडूमध्ये २२ धावा अशी स्थिती असताना रावत धावबाद झाला. त्यानंतर विराटही बाद झाल्यावर दिनेश



कार्तिक आणि ग्लेन मॅक्सवेल ही जोडी बंगळुरुला विजयापर्यंत घेऊन गेली. कार्तिकने नाबाद सात, तर मॅक्सवेलने नाबाद आठ धावा केल्या.

याआधी आरसीबीने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्याने फलंदाजी करणाऱ्या मुंबईची सुरुवात चांगली झाली. त्यानंतर मात्र मुंबईचा संघ ढासळत गेला. एकीकडे संघ खिळखिळा झालेला असताना सूर्यकुमारने मात्र धडाकेबाज नाबाद खेळी केली. त्याने ३७ चेंडूंमध्ये तब्बल सहा षटकार आणि पाच चौकार लगावत ६८ धावा केल्या.

# राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेतील पदक विजेत्यांना रोख पारितोषिक

मुंबई : प्रतिनिधी

भारतीय तलवारबाजी महासंघ व छत्तीसगड तलवारबाजी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने रायपूर येथे २३व्या सब ज्युनियर राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. या स्पर्धेत महाराष्ट्र संघाने तीन रौप्य आणि तीन कांस्यपदके प्राप्त केली. या सर्व खेळाडूंना भारतीय तलवारबाजी महासंघाच्या वतीने एक लाख ३९ हजारांचे रोख पारितोषिक वितरित करण्यात आली आहे.

या स्पर्धेच्या उद्घाटनावेळी भारतीय तलवारबाजी महासंघाचे सरचिटणीस राजीव मेहता यांनी रोख पारितोषिकांची घोषणा केली होती. त्यानुसार भारतीय पदक विजेत्यांच्या बँक खात्यात रोख रक्कम जमा करण्यात आली आहे.

**पदक विजेते व रोख रक्कम प्राप्त खेळाडू**

इपी (वैयक्तिक) प्रकार : मुले–साईप्रसाद जगवाड (लातूर, कांस्यपदक) १० हजार रुपये, इपी प्रकार : मुली–प्राजक्ता पवार (रायगड, रौप्यपदक) १५ हजार रु., जान्हवी जाधव (लातूर, कांस्यपदक) १० हजार रु. सांघिक फॉइल प्रकार : मुले (कांस्यपदक)– वेदांत मुंडे (भंडारा), स्वराज डोंगरे, हर्षवर्धन भांबरे, नरेश वंजारे (औरंगाबाद) सर्वांना प्रत्येकी ५२५० रुपये. इपी प्रकार : मुले (कांस्यपदक)– साईप्रसाद जंगवाड (लातूर), पौरस देशमुख (बुलडाणा), अभिषेक चटप (बीड) व यश टवाळ (औरंगाबाद) प्रत्येकी ५२५० रु. फॉइल प्रकार : मुली (रौप्यपदक)– कनक भोजने, यशश्री वंजारे, अनुष्का अंकमुले (औरंगाबाद) व आशना चौधरी (नागपूर) प्रत्येकी ७७५० रु. इपी प्रकार : मुली (रौप्यपदक)–प्राजक्ता पवार (रायगड), जान्हवी जाधव, वैभवी माने (लातूर) व सई भोसले (सोलापूर) प्रत्येकी ७७५० रु.





खारघर : एस टेनिस सेंटरच्या वतीने आणि रोटरी क्लब ऑफ नवी मुंबई पुरस्कृत रामशेठ ठाकूर चषक खुली टेनिस स्पर्धा खारघर येथे आयोजित करण्यात आली होती. या दोन दिवसीय स्पर्धेला पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी रविवारी भेट देऊन शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पाटील उपस्थित होते. आयोजक जयवंत निकम यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

# 'महाराष्ट्र केसरी' पृथ्वीराज पाटीलला भाजपकडून पाच लाखांचे बक्षीस



कोल्हापूर : प्रतिनिधी

महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज पाटील याला भारतीय जनता पक्षाकडून पाच लाख देऊन सत्कार करणार असल्याची घोषणा माजी मुख्यमंत्री तथा विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. ते कोल्हापूर दौऱ्यावर आले असताना पत्रकार परिषदेत बोलत होते.

सातारा येथे शनिवारी झालेल्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेच्या अंतिम लढतीत कोल्हापूरचा मल्ल पृथ्वीराज पाटील याने मुंबईच्या प्रकाश बनकरला पराभूत केले, पण या लढतीनंतर पृथ्वीराजला बक्षीस देण्यात आले नाही. याबद्दलची खंत पृथ्वीराजने बोलून दाखवली होती.

पृथ्वीराजच्या विजयाने कोल्हापूरला २१ वर्षांनंतर ही मानाची गदा मिळाली. अवघ्या १९ वर्षांचा पृथ्वीराज हा शेतकरी कुटुंबातून आलेला मुलगा आहे. त्यामुळे त्याची कामगिरी ही कौतुकास्पद मानली जात आहे.




पनवेल : श्री. सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक संस्थेच्या वतीने करंजाडे नोड चषक क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. करंजाडे येथे होत असलेल्या या दोन दिवसीय स्पर्धेला भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी रविवारी भेट देऊन शुभेच्छा दिल्या. या वेळी तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील उपस्थित होते. सर्व मान्यवरांचे श्री. सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक संस्थेचे अध्यक्ष मंगेश शेलार यांनी स्वागत केले. सोबत भाजपचे ज्येष्ठ नेते कर्णा शेलार, विशाल पाटील, गणेश कदम, सचिन शेळके, दिनेश शेलार, सत्यजित पाटील, सुरज शेलार, मनीष कटेकर, सागर यादव आदी होते.



पनवेल : श्री दत्त गणेश मंडळाच्या वतीने पनवेल शहर भाजप पुरस्कृत समर्थ चषक क्रिकेट स्पर्धा खांदा कॉलनीत आयोजित करण्यात आली. या स्पर्धेला भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या. या वेळी तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, प्रकाश खानावकर, युवा नेते अभिषेक भोपी, आयोजक सिद्धेश खानावकर आदी उपस्थित होते.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com